# श्री वेंकटेश्वर व्रत कथा



ललिता ऋषिकेश



ऋषिकेश नेहा ललिता



तारीखः सप्टेंबर ५, २०१०



तारीखः सप्टेंबर ७, २०१०



तारीखः सप्टेंबर १२, २०१०



तारीखः सप्टेंबर १२, २०१०

# श्री वेंकटेश्वर व्रत कथा



*Marathi translation by **Aparna & Anirudha Joshi** from Irvine, CA.*

या पुस्तकांच्या प्रतींसाठी :
https://www.venkateswaravratham.org/download
https://www.facebook.com/venkateswaravratham

ई-मेल: info@venkateswaravratham.org
वेबसाईट: www.venkateswaravratham.org

# श्री वेंकटेश्वर व्रत कथा

प्रथम आवृत्ती: मार्च, २०११ (मराठी अनुवाद)

## Contents

सुरुवात करण्यापूर्वी... 5

माझे नाते - सप्त शिखरांच्या ईश्वराशी 5

श्री वेंकटेश्वर मंत्र 13

कल्याण वेंकटेश्वर स्वामी 14

पूजेला लागणारे साहित्य 14

व्रत विधी 15

श्री वेंकटेश्वर व्रत कथा 17

प्रथम अध्याय 37

द्वितीय अध्याय 39

तृतीय अध्याय 41

चतुर्थ अध्याय 42

पंचम अध्याय 44

क्षमार्पणम् 46

ॐ नमो वेंकटेशाय नमः

## सुरुवात करण्यापूर्वी...

*वेंकटाद्रि समं स्थानं नास्ति किंचन ।*
*वेंकटेश समदेवो न भूतो न भविष्यति ॥*

*(पूर्ण ब्रह्मांडात वेंकटाद्रि सारखे दुसरे स्थान कुठेही नाही आणि तिथे वास्तव्य केलेल्या वेंकटेशासारखे दुसरे दैवत ना पूर्वी कधी झाले ना पुढे कधी होणार)*

या कलियुगात श्री वेंकटेश्वराची कृपा आणि आशीर्वाद मिळवण्यासाठी "श्रीवेंकटेश्वर व्रत" सर्वोत्तम मानले जाते. मी परमेश्वराच्या अगाध लीला व खूप चमत्कार ऐकले होते. आयुष्यभर मी देवाची मनोभावे प्रार्थना केली. भक्तांवर सर्वाधिक कृपा करणारे, दयाळू असे बालाजी त्यांच्या भक्तांची दुःखे सदैव निवारण करतात. त्यांच्यावर सतत प्रेमछत्र धरून त्यांच्या चिंता दूर करतात. जो सन्मार्गावर चालतो, परमेश्वराला शरण जातो निःसंशयपणे त्याची परमेश्वर पूर्ण जबाबदारी घेतो.

माझे पूज्य पिता श्री. बुर्ले पुल्ला राव आणि माता श्रीमती बुर्ले वेंकटलक्ष्मी यांनी मला नेहमीच श्रीवेंकटेशाच्या अद्‌भुत लीला सांगितल्या. या सप्तशिखरांच्या ईश्वराबद्दल माझ्या मनात जी निष्ठा आणि प्रेम निर्माण केलं त्याची तुलनाच करता येणार नाही. दिवसांगणित माझं मन वेंकटेश्वराकडे जास्तच ओढले गेले. त्याचे नामस्मरण, पूजा माझ्या जीवनाचा अविभाज्य घटक होऊन बसला. मन एक असाधारण भक्तीने भरून गेले. माझ्या आठवणीत असा एकही प्रसंग नाही ज्या दिवशी मी देवाकडे काही मागितले आहे. कारण माझा परमेश्वरावरचा विश्वास मला खात्रीपूर्वक सांगत होता की माझ्या प्रत्येक सुखदुःखात परमेश्वर माझ्याबरोबर असेलच.

आजकाल देवपूजेमागे भक्तिपेक्षा स्वार्थ जास्त दिसतो. ऐहिक जीवनाशी संबंधित असलेल्या इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठीच पूजा केली जाते. जो कोणी पवित्र मनाने, निरिच्छ होऊन परमेश्वराचे नामस्मरण करेल त्याला परमेश्वराच्या दिव्य दर्शनाचा अलभ्य लाभ जरूर होईल.

परमेश्वर कृपेने मला जे दैवी चमत्कार अनुभवता आले त्यातले काही प्रसंग मी इथे सांगू इच्छिते. श्रीनिवास (सप्तशिखरांचा ईश्वर, वेंकटेश, वेंकटेश्वर, बालाजी, तिरुमलेश, पेरुमल्ला, गोविंद या इतर नावांनीही ओळखला जाणारा), माता-पिता, सासु-सासरे, मुलगा, मुलगी, सून, जावई एकत्र गुण्यागोविंदाने रहात असलेल्या भक्तांच्या घरी वास करतो. तिथे धनदेवता श्रीलक्ष्मी हर्षोल्हासित असते. सर्वसामान्य लोकांच्या मनात कुठली तरी सुप्त इच्छा असणे खूपच स्वाभाविक आहे. इतरेजनांवर संकट आणणारी किंवा इजा पोहोचवणारी इच्छा पुरी व्हावी असा विचारसुद्धा मनात आणू नये. मनात सतत सदिच्छा असाव्या. भगवान श्रीनिवासांच्या मनात आपल्या भक्तांबद्दल अतिशय प्रेम व ममता आहे. आपण सर्वांनी मनःपूर्वक, अहंकार न बाळगता, नि:स्वार्थी होऊन भक्तिभावाने त्याची प्रार्थना केली पाहिजे.

## माझे नाते - सप्त शिखरांच्या ईश्वराशी

माझे वडिल श्री. बुर्ले पुल्ला राव व आई श्रीमती बुर्ले वेंकटलक्ष्मी, दोघांची देवभक्ति अवर्णनीय आहे. त्यांनी अनेकवेळा अनवाणी पायांनी पर्वत चढून श्री बालाजीचे दर्शन घेतले आहे. माझ्या बाबांनी नेहमी मनोभावे बालाजीची पूजा केली आहे. माझा जन्म १९८० साली माझ्या आजोळी, आजोबा श्री. सिंगवरपु अनंत रमुलु व आजी श्रीमती कोटिरत्नम यांच्या घरी खम्मम गावी झाला. २००० साली मी नोकरीच्या निमित्ताने हैद्राबादला होस्टेलवर राहू लागले. एके दिवशी रात्री स्वप्नात मला अत्यंत दैदिप्यमान प्रकाश दिसला. त्याच्या प्रखर तेजापुढे बाकी सगळ्या गोष्टी दिसेनाश्या झाल्या. तेव्हा मला एक आवाज ऐकू आला, "तुला श्री वेंकटेश्वर स्वामीचे व्रत केले पाहिजे, तेसुद्धा ताबडतोब." मी डोळे उघडून बघते तर

खोलीत अजून अंधार होता. मी पुन्हा झोपले. सकाळी उठून अमीर पेटच्या देवळात गेले. तिथल्या पूजारयांना श्री वेंकटेश्वर स्वामींच्या व्रताबद्दल विचारले. त्यांना या व्रताबद्दल काहीच माहिती नव्हती. मी अनेक देवळांत जाऊन तिथल्या गुरूजींना विचारले पण कोणीच या व्रताबद्द्ल ऐकले नव्हते. काही दिवसांनी मी या स्वप्नाबद्दल व व्रताबद्दल विसरूनही गेले. मी दरवर्षी तिरुमलाला जाऊन, अनवाणी पायांनी पर्वत चढून, मंदिराभोवती अंग प्रदक्षिणा (लोटांगण घालून लोळत घातलेली प्रदक्षिणा) घालायची. हे मी कधी नाही विसरले पण स्वप्न आणि त्यातल्या व्रताबद्दल मात्र साफ विसरले.

२००२ साली माझा विवाह ऋषिकेशबरोबर संपन्न झाला. त्याच्याबरोबर मी अमेरिकेत कॅलिफोर्नियाला आले. २००३ मध्ये आमच्या पहिल्या कन्येचा, नेहाचा जन्म झाला. २००५ च्या आमच्या भारत-भेटीत आम्ही तिरुपती बालाजीच्या दर्शनासाठी तिरुमलाला गेलो. मी मनाशी अंगप्रदक्षिणा घालण्याचे ठरवले. आम्ही उतरलो होतो तिथून मंदिर बरेच दूर होते. सकाळी लवकर उठून मी पैसे घेऊन बाहेर पडले. विचार केला, टॅक्सी घेतली तर मी लवकर पोचेन. इतक्यात, तिथे एक टांगा येऊन माझ्यासमोर उभा राहिला. त्यातून वयस्कर गृहस्थ उतरले आणि मला म्हणाले, "मी तुला मंदिरापाशी नेतो, चल बैस माझ्या टांग्यात." मला तेवढा वेळ नव्हता. दहा मिनिटांत मंदिरात पोहोचायचे होते. अंगप्रदक्षिणा घालायला मिळेल की नाही या काळजीत मी होते. मी त्यांना म्हटले, "मी तुमच्याबरोबर टांग्यातून गेले तर उशीर होईल आणि मला अंगप्रदक्षिणा घालता येणार नाही. म्हणून मला टॅक्सीने जायचे आहे म्हणजे मी वेळेत पोचेन." त्यावर ते हसून, वेळेत मंदिरापाशी सोडण्याचे आश्वासन देत म्हणाले, "तू जरूर अंगप्रदक्षिणा घालू शकशील." का कोण जाणे पण त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन मी मागचा-पुढचा विचार न करता टांग्यात जाऊन बसले. त्यांनी मला देवळापाशी आणून एका आजींच्या हाती सोपवले. त्यांचा सतेज चेहरा अजूनही माझ्या डोळ्यासमोर आहे. त्यांच्या पूर्ण चेहरयावर हळदीचा लेप होता व कपाळावर मोठे लालभडक कुंकू होते. नाकात दोन्ही बाजूला मोठ्या चमक्या होत्या व केसांत खूप गजरे होते. खूप सुंदर दिसत होत्या जसं काही साक्षात् देवी पद्मावती समोर उभी आहे. त्यांनीमाझा हात पकडला आणि मला जवळच असलेल्या कुंडापाशी नेले. तीन वेळा मला पाण्यात बुचकळून काढले. माझ्या कपाळावर हळद, कुंकू लावून मला सूर्य नमस्कार घालायला सांगितले. त्यानंतर ध्वज स्तंभाकडून (मुख्य दरवाजातून) मंदिरात नेले. अंगप्रदक्षिणेनंतर श्री वेंकटेश्वराचे खास दर्शनसुद्धा करवले. अशा शुभ दर्शनासाठी मला त्यांचे आभार मानावेसे वाटले. मी इकडे-तिकडे वळून त्यांना शोधले, आसपासच्या लोकांना त्यांच्याबद्दल विचारले पण त्या कुठेच सापडल्या नाहीत.

मला काही सुचेना. जिथे मला टांग्यानी सोडलं होते तिथे जाऊन चौकशी केली. कुणालाच त्या वयस्कर जोडप्याची माहिती नव्हती. तिथल्या पुजारी व इतर लोकांनी खात्रीने या भागात टांगा कधी न बघितल्याचे सांगितले. टॅक्सीसाठी जे पैसे मी हातात घेऊन निघाले होते ते अजूनही हातात तसेच होते. आश्चर्याची गोष्ट अशी होती की तीन वेळा पाण्यात बुचकळल्यानंतरही ते कोरडे राहिले होते. आता माझ्या डोक्यात हळूहळू प्रकाश पडू लागला. मला मंदिरात घेऊन आलेले वयस्कर गृहस्थ, ज्यांच्यावर मी पूर्ण विश्वास टाकला, ते बाकी कोणी नसून प्रत्यक्ष श्रीवेंकटेश्वर होते. ज्या आजींनी माझ्याकडून सूर्यनमस्कार घालून घेतले, मंदिरात व्यवस्थित दर्शन करवले, त्या प्रत्यक्ष देवी पद्मावती होत्या. त्यांना न ओळखण्याच्या चुकीचा पश्चात्ताप मला आजही होतो आहे. पण परमेश्वराच्या या लीलेचा हा सगळा प्रकार लक्षात आल्यावर मला खूप आनंद झाला. मला आजींचे शब्द आठवले, "तुला मी **माझ्या** परमेश्वराचे दर्शन जरूर करवीन." कधी एकदा घरच्या लोकांना सगळा किस्सा सांगीन असं झालं मला. माझे पती, दीर गणेश, त्यांची पत्नी शिवप्रिया व बाकीच्या सर्व लोकांनी आसपासच्या अनेक लोकांना विचारले, सगळयांचे एकच उत्तर आले, "तिरुमलात कोणीही कधीही टांगा बघितलेला नाही." माझ्या बोलण्यावर कोणी विश्वास ठेवो किंवा न ठेवो, मला खात्री आहे की श्री वेंकटेश्वर व देवी पद्मावती वयस्कर जोडप्याच्या रुपात तेथे आले होते.

त्यानंतर आम्ही कॅलिफोर्नियात परतलो. २००५ ची ही तिरुमला-यात्रा माझ्यासाठी अविस्मरणीय ठरली. जे स्वप्न मला २००० साली पडले होते, ते २०१० च्या मे महिन्यात पुन्हा पडले. तोच तेजस्वी प्रकाश, तोच आवाज आणि तीच व्रत करण्याची सूचना. यावेळी सूचनेबरोबर व्रतप्रचाराचा आदेशही होता. श्रीबालाजीच्या

अद्‌भुत लीला सांगून लोकांना हे व्रत करण्याविषयी प्रोत्साहित करायचे कार्य मला देण्यात आले होते. तो आवाज मला पुढे सांगू लागला, "तुझा जन्म या व्रताचा महिमा सामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठीच झालेला आहे." मी परमेश्वराला विचारले, "मी एकटी, कुणाच्या मदतीशिवाय इतकं मोठं कार्य कसे करू शकेन? माझे कोण व का ऐकेल? माझ्यावर विश्वास कसा कोण ठेवेल?" माझे हे सारे प्रश्न ऐकून भगवान हसले आणि म्हणाले, "तू हे व्रत आपल्या घरी कर, तुला आपोआप मार्ग दिसेल." एवढयावरचं हे थांबले नाही. परमेश्वराने मला ताबडतोब याचे पुस्तकही लिहायला सांगितले.

मी माझे पती, ऋषिकेशला या स्वप्नाबद्दल सांगितले. त्याने त्यावर लगेच विश्वास ठेवला व देवाने सांगितलेली प्रत्येक गोष्ट करण्याची तयारी दाखविली. शनिवार, जून २६, २०१० ला पौर्णिमेच्या दिवशी आम्ही पहिल्यांदा हे बालाजी व्रत केले. पुढच्याच महिन्यात रविवारी, जुलै २५, २०१० पौर्णिमेच्या दिवशी परत एकदा व्रत केले. आम्ही १५ वेगवेगळया भाज्या व फळांचा "महानैवेद्य" केला. देवघराचा दरवाजा बंद केला. अर्ध्या तासाने देवघरात एक अकल्पनीय दृष्य बघायला मिळाले. भाताचा एक मोठा घास देवाच्या फोटोवर लागलेला होता. शनिवार, सप्टेंबर ४, २०१० ला एकादशीच्या पवित्र दिवशी आम्ही पुन्हा एकदा व्रत संपन्न केले. याही दिवशी आम्ही "महानैवेद्य" देवाला अर्पण केला. मागच्या वेळेसारखेच देवघराचा दरवाजा बंद केला. नंतर जेव्हा देवघरात गेलो तेव्हा सगळया महानैवेद्याची एक मूद करून ठेवलेली दिसली. मी लगेच सगळयांना आत बोलावून हा चमत्कार दाखवला. सगळे लोक अचंबित झाले. हा दिवस मी कधीच विसरू शकलेली नाही. अशा अतर्क्य चमत्काराला शब्दबद्ध करणे खरंच कठीण आहे. या दिवसापासून आज जानेवारी २, २०११ पर्यंत, रोज आम्हाला असे दैवी चमत्कार अनुभवायला मिळत आहेत. (मराठीतील हा अनुवाद फेब्रुवारी ३, २०११ ला होत आहे. आजही चमत्कारांची शृंखला चालूच आहे.) या अनुवादात आम्ही आमच्या तेलगु पुस्तकात प्रसिद्ध केलेलेच चमत्कार लिहू इच्छितो. हे सारे चमत्कार सप्टेंबर ५, २०१० पासून ऑक्टोबर १०, २०१० पर्यंतच्या काळात घडलेले आहेत.

**सप्टेंबर ५, २०१०:** सकाळी उठून मी आरशात माझा चेहरा बघतच रहिले. माझ्या कपाळावर नाकापासून केसापर्यंत नाम (३ चंदनच्या उभ्या रेघा) आला होता. त्यादिवशी माझी खात्री पटली की देव माझ्याघरी वास करतो आहे. आम्ही देवाची पूजा करून छोट्या-मोठ्या खरेदीसाठी बाहेर पडलो. संध्याकाळी घरी परतलो तर देवघरात आरतीचे तबक तयार होते. निरांजनात तुपासकट वात घालून तयार होती. जसं काही आत्ता आम्ही देवाची आरती करणार आहोत. हे काय प्रकरण आहे? आम्हाला काहीच कळत नव्हते. थोडीशी भीति पण वाटली. घरात तर कोणी नव्हते, दाराला बाहेरून कुलुप होते. आत कोण आलं? कुणी केली ही सगळी तयारी? आम्ही मनाची समजूत घातली की कदाचित् कलियुग-देवता श्रीबालाजीची ही सगळी लीला आहे. मग निश्चिंत होऊन आरती केली. थोड्या वेळाने स्वयंपाकघरात काम करताना एकदम सुवास आला. मी धावत जाऊन देवघरात पाहिले, तिथे चंदनाची उदबत्ती जळताना दिसली. जरा वेळाने मला माझ्या मुलीने येऊन सांगितले की आरतीच्या तबकात निरांजन तूप, वातीसकट तयार आहे. आम्ही देवाची आरती केली. स्वप्नात मला सांगितल्याप्रमाणे श्रीमान नारायण, स्वःत आमच्या घरी आले आहेत. आमच्या खुशीला सीमा राहिली नाही.

**सप्टेंबर ६, २०१०:** आज सकाळी आम्हाला जाग आली तीच बिछान्यातल्या अक्षतांमुळे. अतिशय काळजीपूर्वक आम्ही त्या सगळया अक्षता एका पिशवीत गोळा केल्या. नेहमीप्रमाणे आंघोळ करुन मी देवाची पूजा करत होते. त्याचं नामस्मरण करत होते. इतक्यात मला देवाच्या फोटोत दैदिप्यमान प्रकाश दिसला. ते तेज सहन न झाल्यामुळे मी माझे डोळे बंद केले. त्यानंतर काय झाले मला आठवत नाही. जेव्हा मी डोळे उघडले तेव्हा माझे पती मला हलवून, जोरजोरात हाका मारुन जागं करण्याच्या प्रयत्नात होते. मला वाटले की मी बेशुध्द पडले होते. उठून आरशात बघितले तर कपाळावर पुन्हा नाम आला होता. ह्यावेळी मात्र मी माझं तोंड बघून थोडीशी घाबरले कारण नामाबरोबर एक लालभडक कुंकु पण होतं. मग माझ्या पतीने खुलासा केला की माझ्यात देव आला होता. माझा आवाज पुरूषी झाला होता. त्याच्या बोलण्यावर विश्वास ना बसून मी पुन्हा पुन्हा त्याला विचारले, "खरंच असं झालं कां? मला काहीच का आठवत नाही?" त्या दिवशी दुपारी साधारण १ वाजता आम्ही बाहेर गेलो. संध्याकाळी ६ च्या सुमारास घरी

आलो तर घरातले सगळे दिवे लागलेले, आरतीचं तबक तयार, निरांजनात तूप-वात तयार. दुधात साखर घालून तीर्थसुद्धा तयार होते.

**सप्टेंबर ७, २०१०:** आज देवाच्या फोटोतून हळद यायला लागली. सकाळी पूजेच्यावेळी फोटोजवळ मी हळद ठेवली नव्हती. दुपारी १२:३० च्या आसपास मी माझ्या मुलीबरोबर देवघर असलेल्या खोलीची साफसफाई करण्यासाठी आले. माझी मुलगी मला म्हणायला लागली, "अग आई, ते बघ, देवाच्या फोटोतून हळद येत आहे." आधी वाटलं की जी स्वयंपाकघरात हळद आहे तीच इकडे येते आहे. पण घरात तर एवढी हळद नव्हती. स्वयंपाकघरातल्या हळदीच्या डब्यात बघितले तर त्यावर ॐ आणि स्वस्तिक उमटले होते. मी लगेच माझ्या पतीला ही गोष्ट दाखवली. आम्ही त्या ॐ व स्वस्तिकाचे फोटो काढले. जी हळद देवाच्या फोटोतून येत होती तिला एक अनामिक सुवास होता. त्या वासाने सारं घर भरून गेलं होतं. आलेल्या पाहुण्यांनासुद्धा तो वास आला. रोजच्याप्रमाणे संध्याकाळी आरतीचे तबक तयार होते, निरांजनात तुपासकट वात तयार होती.

**सप्टेंबर ८, २०१०:** आज देवाच्या फोटोतून खूप हळद आली. दुधात मध मिसळून तीर्थ चांदीच्या वाटीत तयार होते. जेव्हापासून हे सारे चमत्कार घरात घडायला सुरूवात झाली तेव्हापासून आम्ही तीन वेळा नैवेद्य दाखवू लागलो. नैवेद्य दाखवल्याशिवाय आमची चिमुरडी नेहा सुद्धा जेवेनाशी झाली आहे.

**सप्टेंबर ९, २०१०:** आज देवाच्या फोटोतून प्रचंड हळद आली. देवाच्या तोंडापर्यंत हळदीचा ढीग साचला. त्यावर नरसिंह स्वामींचे चिन्ह उमटले. आम्हाला आज देवाने नरसिंह स्वामीच्या रुपात दर्शन दिले. आज आम्ही काही ओळखीच्या लोकांना घरी बोलावले होते. त्यातल्या काहींना त्या चिन्हात बालाजी दिसले, काहींना कृष्ण, काहींना नरसिंह स्वामी तर कुणाला ॐ कार दिसला. जो ज्या परमेश्वराच्या रुपाला मानत होता त्याला त्या रुपात दर्शन झाले.

याच दिवशी मला अजून एक अद्भुत घटना बघायला मिळाली. जे लोक आमच्या घरी आले होते त्यांना ही पूर्ण नाही तरी थोडी नक्कीच अनुभवायला मिळाली. आत्तापर्यंत फोटोतून हळद येणे, निरांजनात तुपासकट वात येणे, आरतीचे तबक तयार असणे अशा देवाच्या लीला आम्ही बघितल्या. आता जो प्रसंग मी सांगत आहे तो मनःशांती देणारा आहे. आलेले सर्व लोक त्या अनुभवाने आश्चर्यचकित झाले.

आज सकाळी माझे पती माझ्याआधी उठले, माझ्या तोंडाकडे बघून घाबरले. घाईघाईने त्यांनी मला उठवले आणि विचारायला लागले, "तू तुझ्या तोंडाला काय लावलं आहेस?" प्रश्नचिन्हांकित चेहरयाने मी उठून आरशात बघितले, माझ्या आख्या तोंडावर हळदीचा लेप होता. कपाळावर एक रुपयाच्या नाण्याएवढे मोठे कुंकू होते. त्या कुंकवाचा आकार हळूहळू वाढत होता. हे बघून मीपण विचारात पडले. हे काय होते आहे मला? संध्याकाळी आमचे काही मित्र त्यांच्या कुटूंबियांना घेऊन आमच्याकडे भजन करायला आले. त्यांनी मोठे होत चाललेले कुंकू बघितले. जेव्हा ते भजन म्हणू लागले, मी माझे डोळे मिटून घेतले. डोळयासमोर श्री देवी पद्मावती व श्री वेंकटेश्वर दिसत होते. हे दृष्य बघून सकाळी चेहरयावर आलेल्या हळदी-कुंकवाचे महत्त्व लक्षात आले. त्या हळदी-कुंकवाने मला दिव्य दर्शन बघण्याची शक्ती दिली होती. सामान्य लोकांमध्ये ही शक्ती नसते. परमेश्वराला त्याच्या दैदिप्यमान रुपाला बघण्यासाठी या अद्वितीय शक्तीचे वरदान आधी द्यावे लागले. थोर भाग्य आम्हाला लाभले आहे.

भजनानंतर आम्ही दुध-साखरेचा नैवेद्य दाखवला. सर्वांसमक्ष दुधातल्या साखरेचा मध झाला. हे बघून सारे लोक आनंदित झाले. स्वत:च्या नशीबावर खूष होऊन आपापल्या घरी परत गेले.

**सप्टेंबर १०, २०१०:** रोजच्याप्रमाणे आजही मी आंघोळ करुन देवघरात गेले. देवाच्या फोटोसमोर साठलेल्या हळदीची गणेशमूर्ती तयार झाली होती. आजही खोलीतला दिवा चालू होता. आरतीचे तबक तयार होते, निरांजन तूप-वातीसकट तयार होते. पूजेची सगळी तयारी झाली होती. देवाने गणपतीच्या रुपात दर्शन दिले. त्यादिवशी आलेल्या लोकांनी आश्चर्य व्यक्त केले, "तुमच्याकडे विनायक चतुर्थीसाठी

विनायक आधीच येऊन पोहोचला." परमेश्वराची लीला खरंच अगाध आहे. या लीला मनात साठवून घ्यायला हजार डोळे सुद्धा कमी पडतील.

**सप्टेंबर ११, २०१०:** आजपण घरातले सारे दिवे लागलेले होते. आरतीचे तबक तयार होते, निरांजन तूप-वातीसकट तयार होते. आज सकाळी चेहरयावर आलेले हळदी-कुंकू बघून खूप खूष झाले कारण मला आज पुन्हा दिव्य दर्शन होणार. देवाला फोडणीचा भात व दही-भाताचा नैवेद्य दाखवला. थोड्या वेळाने देवघरात डोकावले तर दोन्ही भात एकत्र होऊन गोपाळकाला झाला होता. हेच आमचे आज जेवण होते.

आज आमच्याकडे थोडे लोक आले होते. त्यातल्या एका बाईंचा अशा चमत्कारांवर विश्वास नव्हता. त्या म्हणाल्या, "दगडाच्या मूर्तीत देव आहे असे मानून आपण आपल्या सगळ्या इच्छा त्या मूर्तीसमोर बोलून दाखवतो. देव तुझ्या घरी आला आहे असे वाटणे हे केवळ तुझ्या मनाचे खेळ आहेत." मग त्यांनी मला तासभर सतराशे साठ प्रश्न विचारले. मी न रागावता त्यांच्या सगळ्या प्रश्नांची शांतपणे उत्तरे दिली. त्यांनी थोडी फुलं आणली होती, ती मी देवासमोर ठेवली. प्रसाद घेऊन त्या निघून गेल्या. नंतर अजून थोडे लोक आले. यांना आम्ही काही वर्षांपासून ओळखत होतो. माझ्या लगेच लक्षात आलं की ते फक्त चमत्कारांची सत्यता पडताळण्यासाठी आलेले आहेत. थोडा वेळ घोटाळून ते प्रसाद न घेताच निघून गेले. संध्याकाळी माझे पती मुलीबरोबर आमच्या मित्रांकडे जेवायला गेले. मी उत्सुकतेने दिव्य दर्शनाची वाट बघत होते.

इतक्यात जे लोक प्रसाद न घेता निघून गेले होते, त्या बाईंचा मला फोन आला. म्हणाल्या, "बालाजी आणि पद्मा नावाच्या एका जोडप्याला तुमच्या घरी यायची इच्छा आहे. मी त्यांना तुमचा पत्ता व फोन नंबर दिला आहे. जर त्यांना घर सापडलं नाही तर ते तुम्हाला फोन करतील." मी हो म्हटले. अजूनही मी देवाच्या दिव्य दर्शनाची अत्यंत आतुरतेने वाट बघत होते. त्याचवेळी बालाजी व पद्मा घरी आले. मी त्यांचे स्वागत केले, त्यांना देवघराकडे नेले. त्यांनी देवदर्शन घेतले आणि म्हणाले, "तुम्ही खूप नशीबवान आहात. देवाची तुमच्यावर कृपा आहे." मी दिलेला प्रसाद त्या दोघांनी अतिशय मनोभावे खाल्ला. थोडावेळ थांबून परत नक्की येतो असे म्हणून ते निघाले. ते गेल्यावर मला पुन्हा एकदा अद्वितीय दिव्य दर्शनाचा अनुभव आला. तोपर्यंत माझे पती व मुलगी घरी आले. मी त्यांना बालाजी आणि पद्मा यांच्याबद्दल व घडलेला सारा प्रसंग सांगितला. हे ही सांगितले की ज्या बाई प्रसाद न घेताच गेल्या होत्या, त्यांनीच या दोघांना आपल्या घरी पाठवले होते. माझ्या पतींना प्रश्न पडला, "ज्या बाई स्वत: या कुठल्याच चमत्कारांवर विश्वास ठेवत नाहीत, त्या बाकी कुणाला आपल्या घरी कशाला पाठवतील?" जोपर्यंत त्यांनी हा मुद्दा काढला नाही तोपर्यंत माझ्या मनात हा विचार पण आला नाही. आता मात्र माझ्या मनात विचार आला, मला दिव्य दर्शन बालाजी व पद्मा यायच्या आधी का नाही झाले? ह्याचं उत्तर मिळणं मला आवश्यक वाटू लागले. सुरुवात आम्ही त्या बाईंना फोन लावण्याने केली. त्यांना जेव्हा बालाजी व पद्मा बद्दल विचारले

तेव्हा त्यांनी सरळ सरळ नकार दिला. त्यांनी कुणालाही आमच्या घरी पाठवले नव्हते. एवढेच नव्हे तर फोनही केला नव्हता. त्या नावाचे कुणीही जोडपे त्यांना माहित नव्हते.

घडलेला सारा प्रकार माझ्या लक्षात यायला आता वेळ लागला नाही. ते जोडपे दुसरे-तिसरे कोणी नसून प्रत्यक्ष लक्ष्मी-विष्णूच होते, आणि मी त्यांना ओळखू शकले नव्हते. मी खूप निराश झाले. देवाला न ओळखण्याची ही चूक मी पुन्हा एकदा केली होती. पूर्वी २००५ च्या तिरुमला-यात्रेत वयस्कर जोडप्याच्या रुपात मला ह्याच दैवी जोडप्याने दर्शन दिले होते. त्याहीवेळी मी त्यांना ओळखायला उशीर केला होता. डोळयात पाणी आणून मी देवाला कळवळून प्रश्न केला, "ही अशी कशी परीक्षा घेतोस?"

रात्री साधारण ११ वाजता देवघराचे दार बंद करून बाहेर टीव्ही बघत होतो. ११:३० च्या सुमारास डोळयावर झोप यायला लागली तशी, झोपण्यापूर्वी एकदा देवाचं दर्शन घायच्या उद्देशाने आम्ही देवघरात गेलो. जे पाहिले त्यावर विश्वासच बसेना. श्री बालाजी व पद्मावतीच्या मूर्तीतून मध वाहात होता. माझे

पती तर अचंबितच झाले. आम्ही लगेच त्याचे फोटो आणि फिल्म घेतली. दीर व जावेला स्काईप (इंटरनेट) वर यायला सांगितले. त्यांनी हा अद्भुत चमत्कार वेब कॅमेरयातून बघितला. त्यांच्या आनंदाला पारावार नव्हता. अजून एक गोष्ट माझ्या नजरेस पडली, जी फुलं विश्वास न ठेवणारया बाईंनी आणली होती, ज्यांनी मला सतराशेसाठ प्रश्न विचारले, ती पार बाजूला फेकलेली होती. ते बघून आम्ही ठरवले की इथून पुढे देवावर विश्वास ठेवणारया लोकांनीच आणलेली फुले देवाला वाहायची. आलेला प्रत्येक दिवस अविस्मरणीय आठवणी व दैवी अनुभव मागे सोडतो आहे.

**सप्टेंबर १२, २०१०:** आज हळदीच्या शिगेवर कुंकू येऊ लागले. मध तर अजूनही वाहतोच आहे. आज दाखवलेला नैवेद्य देवाने ग्रहण केला नाही. संध्याकाळी तळलेल्या तोंडल्याची भाजी आणि भाताचा नैवेद्य दाखवला. थोड्या वेळाने देवघरात डोकावले तर भातात भाजी कालवून त्याचा मोठा लाडू करून ठेवला होता. आम्ही तो आलेल्या सगळया लोकांमध्ये वाटून टाकला.

**सप्टेंबर १३, २०१०:** आज सकाळी आम्ही काजू-बेदाण्याचा नैवेद्य दाखवला. देवाने अर्धे खाल्ले आणि अर्धे आम्हाला ठेवले. आजही आरतीचे तबक तयार होते, निरांजनात तुपासकट वात ठेवलेली होती. मी मुलीला शाळेत सोडून आले. माझ्या पतीशी फोनवर बोलत मी स्वयंपाकघरात काम करत होते. तेवढ्यात मला पैंजणाचा आवाज आला. मी फोनवर पट्कन विचारले, "तुला पैंजणाचा आवाज आला का?" त्याला ऐकू आला नाही. मी व्हिडिओ कॅमेरा सुरू केला. घेतलेली फिल्म स्काईप वर दीर, जावेला दाखवली. तेव्हा त्यांना तो आवाज ऐकू आला. मला एकदम हुश्श झाले, माझ्या काही मनाचा खेळ नव्हता तो. मग मात्र मी खूप खुश झाले, मी प्रत्यक्ष देवीच्या नृत्याचा आवाज ऐकला होता.

दुपारी मी आणि माझ्या मुलीने पैंजणांचा मधूर आवाज पुन्हा ऐकला. जवळ-जवळ ५ मिनिटं ऐकू येत होता. जसं काही देवी पैंजण घालून घरात हिंडत होती. रात्री मात्र माझ्या पतीलाही हा दैवी आवाज ऐकण्याचे भाग्य मिळाले.

**सप्टेंबर १४, २०१०:** मधाचा प्रवाह आजही अखंडित आहे. आम्ही आलेल्या भक्तांना, मित्रांना, पाहुण्यांना तीर्थ म्हणून मध दिला.

**सप्टेंबर १५, २०१०:** आज बरेच कुंकू आले. मध ज्या वाटीत गोळा करत होतो ती वाटी आज पूर्ण भरली. तिच्याजागी दुसरी वाटी ठेवली.

**सप्टेंबर १६, २०१०:** आज सफरचंदाचा नैवेद्य दाखवला. जरा वेळाने बघितले तर देवाने त्यातला थोडा भाग खाल्ला होता.

**सप्टेंबर १८, २०१०:** आतापर्यंत देवाचा फोटो हळदी-कुंकवाच्या ढिगात लपला होता. आज तो हळदी-कुंकवाचा ढीग थोडा ओसरला होता. परमेश्वराचा मुगुट व मुख दिसू लागले. पहिल्यापेक्षा ते जास्त तेजस्वी दिसत होते. ते हळदी-कुंकू आम्ही भक्तांना प्रसादाच्या रुपात देऊ लागलो. मधाच्या प्रवाहात खंड पडण्याचे लक्षण दिसत नव्हते. मध्येच १० मिनिटे धार खूप मोठी झाली. दुपारी मुगाच्या डाळीच्या खिचडीचा नैवेद्य दाखवला. बाहेर जाऊन टीव्ही बघत १५ मिनिटे झाली नाही तोच माझ्या तोंडात खिचडीचा घास आला. आत जाऊन बघितले तर देवानेसुद्धा खिचडी खाल्ली होती. *(आमच्या वेब साईट वर सप्टेंबर १८, २०१० च्या फोटोंमध्ये आपल्याला हे बघता येईल.)*

**सप्टेंबर १९, २०१०:** आज नैवेद्यातल्या सफरचंदाचा घास देवाने स्वःत खाल्ला आणि मलाही भरवला. मला भरवलेला घास अर्थातच माझ्या तोंडात आला. त्यावेळी मी स्वयंपाकघरात काम करत होते. लगेचच मी माझ्या पतीला सांगितले. झट्कन त्याने देवघरात जाऊन बघितले तर ताटलीतल्या सफरचंदाचे दोन तुकडे तोडलेले दिसत होते.

संध्याकाळी फळांच्या रसाचा नैवेद्य दाखवला. थोड्या वेळाने बघितले तर थोडासाच रस शिल्लक होता. देवाने नैवेद्य स्वीकारल्याची ही खूण सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ होती. उरलेला रस आम्ही प्रसाद समजून भक्तीभावाने प्यायला. मधाची धार अजूनही अखंडित आहे.

**सप्टेंबर २०, २०१०:** आज भात आणि तळलेल्या तोंडल्याच्या भाजीचा नैवेद्य केला होता. काहीवेळाने देवघरात डोकावले तर भातात भाजी कालवून त्याचे चार लाडू ताटलीत ठेवले होते. संध्याकाळी पोळी व चण्याच्या उसळीचा नैवेद्य दाखवला. हाही नैवेद्य देवाने प्रेमाने खाल्ला. शिल्लक राहिलेली पोळी व उसळ आम्ही खाऊन टाकली. प्रत्येक दिवशी परमेश्वर वेगवेगळ्या प्रसंगातून त्याचे अस्तित्व आम्हाला दाखवत आहे. मध अजूनही वाहतोच आहे.

**सप्टेंबर २१, २०१०:** आज भात आणि पालकाच्या डाळ घालून केलेल्या भाजीचा आम्ही नैवेद्य दाखवला. जरा वेळाने देवघरात गेलो. ताटातली भाजी भातात कालवली होती. त्यातले काही घास देवाने खाल्ले होते. आरतीच्या तबकात निरांजन होते, त्यात तूप व वात घालून ठेवली होती. दुधात मध घालून चांदीच्या वाटीत तीर्थही तयार होते. या कलियुगात परमेश्वर त्याचं अस्तित्व अतर्क्य अशा दैवी चमत्कारांमधून आपल्यापर्यंत पोहोचवत आहे. हे आमचे अहोभाग्य की त्यासाठी त्याने आमचे घर निवडले.

**सप्टेंबर २२, २०१०:** आज आमटी-भाताचा नैवेद्य दाखवला. थोड्या वेळाने देवघरात डोकावलो तर आमटी भातात मिसळली होती. त्यातले काही घास देवाने खाल्ले होते. संध्याकाळी काही द्राक्षे देवापुढे ठेवली. आम्ही जेवायला बसलो आणि एकदम माझ्या तोंडात द्राक्षं आली. देवघरात जाऊन बघितले तर देवापुढे ठेवलेल्या द्राक्षातील फक्त दोनच द्राक्षं शिल्लक होती.

**सप्टेंबर २३, २०१०:** आजही आम्ही देवाला द्राक्षांचा नैवेद्य दाखविला. त्यातली काही द्राक्षं परत माझ्या तोंडात आली. माझ्या पतीचे मित्र आमच्या घरी आले होते. ते यायच्या थोडंसच आधी, मूर्तीतून वाहणारया मधाची धार वाढली होती. माझे पती त्या मधाची फिल्म घेत असतानाच आरतीच्या तबकातली निरांजनाची जळलेली वात पुन्हा पेटली. ती ज्योत नेहमीपेक्षा जास्त तेजस्वी होती. हे अकल्पित दृष्य दाखवण्यासाठी त्यांनी मला व बाकीच्या सगळया लोकांना तातडीने आत बोलावले. असे दैवी चमत्कार बघून सगळेजण मनोमन धन्य झाले.

**सप्टेंबर २४, २०१०:** आज सकाळच्या व दुपारच्या नैवेद्याला देवानी हात लावला नाही. संध्याकाळी आम्ही देवासमोर बेदाणे ठेवले आणि कामासाठी घराबाहेर पडलो. साधारणतः आम्ही घरापासून ५ किलोमीटरवर असू. अचानक माझ्या तोंडात बेदाणे आले. आत्तापर्यंत सगळे चमत्कार घरातच होत होते. हा घराबाहेरचा पहिलाच अनुभव. मी तर आनंदाने वेडीच झाले.

**सप्टेंबर २५, २०१०:** आज मी देवघरात जाण्यापूर्वीच आरतीची तयारी तबकात झालेली होती. निरांजनात तूप घालून वात लावून ठेवली होती, दुधात मध घालून तीर्थसुद्धा तयार होते. आम्ही सगळयांनी मिळून पूजा केली. सप्टेंबर ४ ला मी चंदनाच्या पुडीत पाणी मिसळून गंध बनवले होते. आजपर्यंत त्यातलं पाणी सुकलेलं नाही. पूजा करून झाल्यावर माझ्या लक्षात आले की माझ्या कपाळावर एक ठिपका उठला होता, तो कुंकुवाचा नव्हता, गंधाचा होता. माझ्या मानेवरही त्याच गंधाचा नाम उठला होता. त्यानंतर माझे पती मुलीबरोबर बाहेरच्या खोलीत खेळत होते. मी स्वयंपाकघरात काम करत होते. अचानक देवघरात तीन चंदनाच्या उदबत्त्या लागल्या. त्याचा सुवास काही क्षणातच घरभर पसरला. आज भाज्या घातलेल्या पुलावाचा नैवेद्य दाखविला. देवाने तो भात खाल्ला. त्या दिवशी संध्याकाळी आरतीचे तबक तयार होते, निरांजनात तूप घालून वात लावलेली होती. पूजेची सारी तयारी झाली होती. काळया द्राक्षांचा दाखवलेला नैवेद्य मात्र देवाने खाल्ला नाही.

**सप्टेंबर २६, २०१०:** आज सकाळचा व दुपारचा नैवेद्य देवासमोर तसाच होता. संध्याकाळी थोडी फळं देवासमोर ठेवली. ती खाण्यासाठी देवाची कळवळून प्रार्थना केली आणि घराबाहेर पडलो. घरापासून ४-५

किलोमीटर दूर गेलो असू किंवा नसू, माझ्या तोंडात द्राक्षं आली. पट्कन घरी गेलो. देवघरात ठेवलेल्या नैवेद्याच्या थाळीतून द्राक्षं कमी झालेली दिसली.

**सप्टेंबर २७, २०१०:** आज आम्ही काही सफरचंदाचा नैवेद्य दाखविला. देवाने एक घास खाल्ला आणि एक माझ्या तोंडात आला. संध्याकाळी केळयाचा नैवेद्य दाखविला. थोड्या वेळाने एक तृतीयांश केळे तोंडातून बाहेर आले. हे केळं साल सोलून काढलेल्या केळाइतके व्यवस्थित होते. त्यावर कुठेही दातांच्या खुणा नव्हत्या. देवघरात जाऊन बघितले तर तेवढंच एक तृतीयांश केळे तिथे नव्हते. उरलेल्या केळयाशेजारी उजवीकडे एक मधाचा थेंब पडला होता.

गेल्या तीन आठवड्यापासून देवाच्या मूर्तीतून मधाचा प्रवाह अखंड चालू आहे.

**ऑक्टोबर १०, २०१०:** आज आम्ही सफरचंदाचा नैवेद्य दाखविला. नंतर मी स्वयंपाकघरात जेवणाच्या तयारीत गुंतले. अचानक देवघरातून मला गोड वास येऊ लागला. आत जाऊन बघते तर जे दृष्य दिसलं त्यावर विश्वास ठेवणं फार कठीण होते, स्वप्नातसुद्धा असा विचार आला नसता. सफरचंद आहे तसच होतं पण त्याच्या बाजूला तिरुपतीचा लाडू होता. तिरुपतीचा लाडू आम्ही यापूर्वी बरेचवेळा खाल्ला आहे. पण इतका गरम लाडू आधी कधीच खाल्ला नव्हता. खाताना बोटाला लागलेले तूप सरळ सरळ दिसत होते. त्याची चव तर तोंडात अजून आहे.

**************

माझ्यासारख्या सामान्य, घरगुती बाईला हे "श्री बालाजीचे दैवी चमत्कार" पुस्तक लिहिणे सोपे नव्हते. कलियुगाचे देवता श्रीवेंकटेश्वर आणि देवी पद्मावती यांच्या आशिर्वादानेच हे शक्य झाले आहे.

माझे पती ऋषिकेश यांनी हे पुस्तक लिहिण्यासाठी मला प्रोत्साहन दिले. त्यांनी स्वःत या मूळ तेलगु पुस्तकाचे इंग्लिश भाषांतर केले. मी माझ्या मुलीचे, नेहाचे सुद्धा आभार मानते. श्री वेंकटेश्वर व्रताचे मूळ लेखक श्री. तिम्मुराज विश्वपति रामकृष्ण मुर्ति यांचे मनःपूर्वक आभार मानते. माझी परमेश्वराकडे एकच प्रार्थना आहे की ज्या ज्या लोकांनी हे पुस्तक प्रसिद्ध करण्यात माझी मदत केली आहे, माझ्या बोलण्याकडे लक्ष दिले आहे, त्या सगळयांवर तुझी सदैव कृपा असु दे. माझी मनःपूर्वक सदिच्छा आहे, जो कोणी हे व्रत भक्तिभावाने संपन्न करेल त्याला परमेश्वर कृपेचा लाभ जरूर होईल.

*ललिता ऋषिकेश*

## श्री वेंकटेश्वर मंत्र

कलियुगाचे दैवत, श्रीवेंकटेश्वराने वेदांमध्ये सांगितलेल्या मंत्रापैकी काही मंत्र मला सांगितले. त्यातला हा मंत्र रोज म्हणण्याने भक्तिचा मार्ग अवलंबणे सुलभ होईल.

मुरारिसेवक जरादिपीडित निरार्थिजीवन निराश भूसुर
वरातिसुन्दर सुरांगनारति करांगसौष्ठव कुमारताकृति
कुमार तारक समापनोदय तनूनपातक महापदामय
विहापनोदित सकलभुवन विदित कुमारधाराभिधान तीर्थादिष्टितस्य
धरणीतल गत सकल हतकलिल सुभासलिल गतबहुल
विविधमलः अतिचतुर रुचिरतर विलोकनमात्र विदलित
विविधमहापातक स्वामीपुष्करिणि समेतस्य

जे भक्त हा मंत्र रोज म्हणतील, त्यांचे जीवन आरोग्यपूर्ण व समृद्ध होईल.

*ललिता ऋषिकेश*

## कल्याण वेंकटेश्वर स्वामी



## पूजेला लागणारे साहित्य

६ नारळ – १ कलशावर ठेवण्यासाठी व बाकीचे ५ प्रत्येक अध्यायानंतर वाढवण्यासाठी
१ कापसाचे वस्त्र, १ कलश , १ खण, तो नसल्यास नवीन १ मीटर कापड
हळद, कुंकू, अक्षता, उदबत्ती, आरतीसाठी कापूर
विड्याची पाने किंवा आंब्याची पाने ( ३ – ५ कलशासाठी, २ गणेश पूजेसाठी)
फूल, तुळस, पंचामृत (दही, दूध, तूप, मध व साखर)
गणपतीच्या नैवेद्यासाठी गुळाचा छोटा तुकडा
व्रताच्या नैवेद्यासाठी गव्हाचा जाड रवा, तूप, पिठीसाखर, केळे, वेलदोड्याची पूड. रवा तुपात भाजून गार झाल्यावर त्यात साखर, केळे व वेलदोड्याची पूड घालावी. रवा दूध अथवा पाण्यात शिजवू नये.

# व्रत विधी

श्री तिम्मुराज विश्वपति रामकृष्ण मुर्ती द्वारा

कलियुगात श्री बालाजीची कृपा मिळवण्यासाठी हे व्रत संपन्न करणे अत्यंत सुलभ आहे. हे व्रत संपन्न केल्यावर लगेचच सगळे कष्ट दूर होतात. हे अत्यंत सोपे असे व्रत मला वैकुंठवासी नारायणाने स्वःत सांगितले आहे. हे व्रत कुणीही, कुठेही आणि कधीही करू शकतात. आर्थिक किंवा आरोग्याबाबत प्रश्न असो, मन अस्वस्थ असो अगर अन्य काहीही कारण असो, हे व्रत करण्याने सारी चिंता दूर होईल. जर एखादे शुभकार्य ठरले असेल तर त्यात कुठलेही विघ्न येऊ नये म्हणूनही हे व्रत करावे. नोकरी-धंद्यातील उन्नतिसाठीदेखील हे व्रत करणे फायदेशीर ठरते.

ह्या व्रताचे दोन भाग आहेत.

**प्रथम भाग**

वर सांगितल्याप्रमाणे हे व्रत कधीही करता येते. मुख्यत्वे मार्गशीर्ष, माघ, कार्तिक महिन्यातील पौर्णिमा, पंचमी, सप्तमी, एकादशी या तिथींना किंवा श्रवण, स्वाती नक्षत्रांच्या दिवशी करावे. सकाळी किंवा संध्याकाळी हे व्रत करता येते.

या व्रतात पाच अध्याय आहेत. पहिला अध्याय साक्षात् श्री बालाजीच्या कृपेने लिहिला गेला आहे. बाकीचे चार अध्याय महा तपस्वी श्री विश्वामित्र, वसिष्ठ, भरद्वाज आणि अत्रि यांनी सांगितले आहेत. आपल्या स्वगृही अथवा मुक्कामाच्या ठिकाणी, मंदिरात किंवा अन्य कुठल्याही पवित्र स्थानी, नदीकाठी हे व्रत संपन्न करता येते.

शक्य असेल तर बंधू-मित्रांच्या समवेत हे व्रत करणे जास्त पुण्यफलदायी आहे. सर्वप्रथम पूजेची जागा स्वच्छ करावी. नंतर छोटा मंडप तयार करुन त्यात श्री बालाजीची तस्वीर किंवा मूर्ती ठेवावी. त्या तस्वीरीत श्रीदेवी, भूदेवी असतील किंवा त्यांच्या मूर्ती असतील तर अधिकच उत्तम. तस्वीरीबरोबर एक रुपयाचे नाणे ठेवावे. त्यानंतर कलशाची स्थापना करावी.

हे व्रत निर्विघ्नपणे पार पडावे यासाठी सर्वप्रथम हळदीच्या गणेशमूर्तीची पूजा करावी. (हळद पाण्यात कालवून त्या गोळीला गणपती बनवणे.) शेवटी व्रतकथेचे पाच अध्याय वाचावे. साक्षात् परमेश्वराचे म्हणणे आहे की जो कोणी निष्ठा व भक्तिभावाने हे व्रत संपन्न करतो, तेथे परमेश्वर कोणत्या ना कोणत्या रुपात येऊन प्रसाद स्वीकारतो.

**द्वितीय भाग**

साक्षात् बालाजीने पीडितांसाठी एक साधा उपाय सांगितला आहे. जर काही कारणास्तव किंवा अडचणीमुळे पूर्ण व्रत करणे शक्य होत नसेल तर एकटे बसूनसुद्धा हे व्रत करता येते.

श्री बालाजीच्या मंडपासमोर बसून आधी गणपतीचे नमन करावे. नंतर अष्टदिक्पालक व नवग्रहांचे मनातल्या मनात नामस्मरण करावे. तुळस, नारळ व उपलब्ध असलेली फळे-फुले तबकात ठेवावी. बालाजीचे स्मरण करुन व्रतकथा मनापासून वाचावी. प्रत्येक कथेच्या शेवटी गोविंद...गोविंद...गोविंद... असं तीन वेळा नामस्मरण करुन एक नारळ परमेश्वराला अर्पण करावा. नारळांच्या पाण्याचा व खोबरयाचा

प्रसाद घ्यावा. यामुळे सारे कष्ट व चिंता लगेच दूर होतात. महाप्रसादासाठी गव्हाच्या रव्यात साखर व केळे मिसळावे. (हा प्रसाद शिजवत नाहीत.)

बालाजीला तुळस अतिप्रिय आहे. त्यामुळे पूजेत तुळस असणे महत्त्वाचे आहे. व्रत संपन्न झाल्यावर त्या तुळशी प्रसाद म्हणून ग्रहण कराव्या. त्याने रोगनिवारण होते व अष्ट ऐश्वर्यांची प्राप्ति होते. नारळाचे तुकडे देवाला व आलेल्या सर्व लोकांना वाटणे अतिशय पुण्यप्रद आहे.

हे व्रत विधीपूर्वक कलशस्थापनेसहित विस्ताराने संपन्न करावे. अगदीच शक्य नसेल तर द्वितीय भागात सांगितल्याप्रमाणे अल्प प्रमाणात करावे.

एक गोष्ट सर्वांनी लक्षात ठेवली पाहिजे. आपल्या चिंता, दुःख परमेश्वराला आधी माहित आहेत. तेव्हा त्या दयाघनाची प्रार्थना करुन, संकल्प करुन, व्रत संपन्न करण्याने मनोकामना निश्चित पूर्ण होते. सर्व चिंता व कष्ट दूर होऊन अष्ट ऐश्वर्यांची प्राप्ति होते.

समस्त सन्मंगलानिभवंतु ।<br>
श्री लक्ष्मी श्रीनिवास कटाक्ष सिद्धिरस्तु ।।

# श्री वेंकटेश्वर व्रत कथा

## श्रीगणपती ध्यानम्

वक्रतुण्ड महाकाय कोटिसूर्यसमप्रभ।
निर्विघ्नम् कुरुमे देव सर्वकार्येषु सर्वदा।
शुक्लांबरधरम् विष्णुम् शशिवर्णम् चतुर्भुजम्।
प्रसन्न वदनम् ध्यायेत् सर्वविघ्नोपशांतये ॥
तदेव लग्नम् सुदिनम् तदेव ताराबलम् चंद्रबलम् तदेव ।
विद्याबलम् दैवबलम् तदेव लक्ष्मीपते तेंघ्रियुगम् स्मरामि ॥

## आचमनम्

| | | |
|---|---|---|
| ॐ केशवाय स्वाहा । | ॐ नारायणाय स्वाहा । | ॐ माधवाय स्वाहा । |
| ॐ गोविंदाय नमः । | ॐ विष्णवे नमः। | ॐ मधुसुदनाय नमः। |
| ॐ त्रिविक्रमाय नमः। | ॐ वामनाय नमः। | ॐ श्रीधराय नमः। |
| ॐ हृषिकेशाय नमः। | ॐ पद्मानाभाय नमः। | ॐ दामोदराय नमः। |
| ॐ संकर्षणाय नमः। | ॐ वासुदेवाय नमः। | ॐ प्रद्युम्नाय नमः। |
| ॐ अनिरुध्दाय नमः। | ॐ पुरुषोत्तमाय नमः। | ॐ अधोक्षजाय नमः। |
| ॐ नरसिंहाय नमः। | ॐ अच्युताय नमः। | ॐ जनार्दनाय नमः। |
| ॐ उपेंद्राय नमः। | ॐ हरये नमः। | ॐ श्रीकृष्णाय नमः। |

## भूतोच्चाटनम्

अक्षता हातात घेऊन खालील मंत्र म्हणणे.
उत्तिष्टंतु भूतपिशाच्चाः एते भूमिभारकाः।
ऐतेशामविरोधेन ब्रह्मकर्म समारभे ॥
अक्षता खांद्यावरून मागे टाकणे.

## प्राणायामम्

ॐ भूः, ॐ भुवः, ॐ सुवः, ॐ महः, ॐ जनः, ॐ तपः, ॐ सत्यम्, ॐ तत्सवितुर्-वरेण्यम् भर्गो देवस्य धीमहि, धियो य़ो नः प्रचोदयात्, ॐ आपो-ज्योतिः-रसोवृतम् ब्रह्म भूर्भुवस्सुवरोम्॥
मम उपात्त दुरिताक्षयद्वारा श्री परमेश्वर प्रीत्यर्थम् शुभे शोभन मुहुर्ते श्री महाविष्णोः आज्ञया प्रवर्ते मानस्य आद्यब्रह्मणः द्वितीय परार्थे श्वेत वराहकल्पे वैवस्वत मन्वन्तरे कलियुगे प्रथमपादे जम्बूद्वीपे भरतवर्षे भारत खन्डे मेरोः दक्षिण दिग्भागे, श्रीशैलस्य, ..(*मुक्कामाच्या गावाचे नाव घेणे*) ...प्रदेशाय, कृष्णा, गोदावरी मध्यभागे, स्व-शोभन गृहे, समस्त देवता ब्राह्मण, हरिहर सन्निधौ, अस्मिन् वर्तमान व्यवहारिक चान्द्रमानेन स्वस्तिश्री प्रभवादि नाम संवत्सर मध्य संवत्सरे, अयने, ऋतौ, .(*चालू महिन्याचे नाव*

*घेणे)*..मासाय, .*(चालू पक्ष)* ...पक्षाय, .*(आजची तिथी)*...तिथौ, .*(आजचा वार)*...वासरे, शुभनक्षत्रे, शुभयोगे, शुभकरण एवं गुण विशेषण विशिष्टायाम् शुभतिथौ श्रीमान..*(आपले व सर्व कुटूंबियांची नावे)*.. गोत्रः.... नामधेयः धर्मपत्नी समेतस्य अस्माकम् सहकुटुंबानाम्, क्षेम, स्थैर्य, धैर्य, विजय, आयुर्–आरोग्य, ऐश्वर्य–अभिवृध्यर्थम्, धर्मार्थ काममोक्ष चतुर्विध पुरुषार्थ फल सिद्ध्यर्थम् ममोपात्त दुरिताक्षय द्वारा श्री परमेश्वर प्रीत्यर्थम् श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्री वेंकटेश्वर देवता मद्दिष्य श्री वेंकटेश्वर व्रतकल्प करिष्ये द्रवैः संभवद्धिः पदार्थे संभवता नियमेन यावच्छक्ति ध्याना वाहनादि षोडषोपचार पूजाम् करिष्ये। *(हातावर पाणी घालावे.)*

## तदंग कलशाराधनम् करिष्ये

*(बालाजीच्या उजवीकडे कलश ठेवावा. त्याला गंध, पुष्प, कुंकू व अक्षता लावाव्या. मग पुढील श्लोक म्हणावे.)*

**श्लोकं**

कलशस्य मुखे विष्णु: कांते रुद्र: समाश्रिता:।
मूले तत्र स्थितो ब्रह्मा मध्ये मातृगणाश्रित:॥
कुक्षौतु सागरा सर्वे सप्तद्वीप वसुंधरा ।
ऋग्वेदोत यजुर्वेद: सामवेदोह्यथर्वणा: ।।
अंगैश्च सहिता: सर्वे कलशांबु समाश्रिता:।
कलशे गंधपुष्पाक्षताम् निक्षिप्स्य, हस्तेनच्छाद्य ॥
आपो वा इदम् सर्वं विश्वभूतान्याप: प्राणवा आपा: ।
पश्व: आपोन्नामापोमृता मापा: सम्राादपो विराडापा ॥
स्वराडापश्चंडाम् स्यापो ज्योतिम् श्यापो यजोमश्याप ।
सस्त्यामाप: सर्वा देवता आपोभूर्भुवसुव राप ॐ ॥
*(कलशात पाणी भरावे व त्यात तुळशीची पाने घालावी.)*

**श्लोकं**

गंगे च यमुने च कृष्णे गोदावरी सरस्वति ।
नर्मदे सिंधु कावेर्यो जलेस्मिन् सन्निधिम् कुरु ॥
कावेरी तुंगभद्रा च कृष्णवेणी च गौतमी ।
कलशोदेकेन देवात्मानम् पूजाद्रव्यानि च सम्प्रोक्ष्या॥
*(कलशातल्या पाण्यात एक फूल बुडवून त्याने श्रीबालाजीच्या मूर्तीवर/फोटोवर, पूजेच्या सामग्रीवर व स्वःतावर पाणी शिंपडावे.)*

## श्री गणपती प्रार्थना

शुक्लांबरधरम् विष्णुम् शशिवर्णम् चतुर्भुजम्।
प्रसन्नवदनम् ध्यायेत् सर्वविघ्नोपशांतयेत् ॥
आदौ निर्विघ्नेन व्रत परिसमाप्तम् गणपती पूजाम् करिष्ये॥

## अथः गणपती पूजा

*(हळदीच्या अथवा सुपारीच्या गणपतीची पूजा खालीलप्रमाणे करावी. ज्या गोष्टी उपलब्ध नसतील त्यावेळी श्लोक म्हणून अक्षता वाहाव्यात. दोन विड्याची पाने कलशासमोर ठेवून त्यावर गणपती ठेवावा.)*

**ॐ गणानाम त्वागणपतीम् हवामहे । कविं कवीनामुपा मस्श्रवस्तवम् ।**
**ज्येष्ठराजम् ब्रह्मणाम् ब्रह्मणस्पत । आनश्शुण्यनुतिभिः सीदसाधनम् ॥**

श्री महागणाधिपतये नमः । ध्यायामि, ध्यानम् समर्पयामि ॥
*(गणपतीला नमस्कार करावा.)*

**आवाहयामि, रत्नसिंहासनम् समर्पयामि, पाद्यौ पाद्यम् समर्पयामि,**
**हस्तौः अर्घ्यम् समर्पयामि, मुखे आचमनीयम् समर्पयामि ॥**

**आपोहिष्टांयोभुवस्तान ऊर्जेध्दातन, महेरणाय चक्षसे।**
**यो वत् शिवत मोरसस्तस्य भाजयतेहनः उषतीरिना मातरः ।**
**तस्मारम् गमामवो यस्याक्षयाय जिंधव, आपोजनयाधाचनः ॥**

श्री महागणाधिपतये नमः - शुद्धोदक स्नानं समर्पयामि ॥
स्नानांतरम् शुद्ध आचमनम् समर्पयामि ॥
*(एक पळी पाणी ताम्हणात सोडावे.)*

**अभिवस्त्रातु वसनान्यार शभिदेनुत्सु दुघाः पूजमानः ।**
**अभिचंद्रा भर्ता वे नो हिरण्याभ्यश्वनरतिनोदेव सोम ॥**

श्री महागणाधिपतये नमः - वस्त्रयुग्मम् समर्पयामि ॥
*(कापसाचे वस्त्र केले असल्यास गणपतीला वाहावे.)*

**यज्ञोपवीतम् परमं पवित्रम् प्रजापते सहजम् यत् :पुरस्तात् ।**
**आयुष्यंग्रेयम् प्रतिमुञ्च शुभ्रं यज्ञोपवीतम् बलमस्तु तेजः ॥**

श्री महागणाधिपतये नमः - यज्ञोपवीतम् समर्पयामि ॥
*(जानवी-जोड असल्यास गणपतीला वाहावा.)*

**गंधद्वाराम् दुराधर्षाम् नित्यपुष्टान् करिषिणीम्।**
**ईश्वरीम् सर्वभूतानाम् ता मिहोपव्हये श्रियम्॥**

श्री महागणाधिपतये नमः - दिव्य श्री चंदनं समर्पयामि ॥
*(गणपतीला गंध लावावे.)*

**आयने ते परायणे दुर्वाः रोहंतु पुष्पिणीः ।**
**हृदाश्च पुंडरीकाणि समुद्रस्य गुहा इमे ॥**

श्री महागणाधिपतये नमः - दुर्वादि नानाविध पुष्पाणि समर्पयामि ॥
*(दुर्वा असल्यास गणपतीला वाहाव्या.)*

## अथ श्री षोडषनाम पूजा

ॐ सुमुखाय नमः।
ॐ एकदंताय नमः।
ॐ कपिलाय नमः।

ॐ गजकर्णिकाय नमः।
ॐ लम्बोदराय नमः।
ॐ विकटाय नमः।
ॐ विघ्नराजय नमः।
ॐ गजाधिपतये नमः।
ॐ धुमकेतवे नमः।
ॐ गणाधिक्षाय नमः।
ॐ फालचंद्राय नमः। *(ॐ भालचंद्राय नमः। असेही म्हणतात.)*
ॐ गजाननाय नमः।
ॐ वक्रतुंडाय नमः।
ॐ शुर्पकर्णकाय नमः।
ॐ हेरम्बाय नमः।
ॐ स्कंदपूर्वजाय नमः।
ॐ सर्वासिध्दि प्रदायकाय नमः।
ॐ महागणाधिपतये नमः।

नानाविध परिमल पुष्पाणि समर्पयामि ॥
*(गणपतीला फुले वाहावी.)*

**वनस्पत्युर्भवै: दिवै: नाना गंधै: सु सम्युतम्।**
**आघ्रेय: सर्वदेवानाम् धूपोयम् प्रतिगृह्यताम् ॥**

श्री महागणाधिपतये नमः – धूपमाघ्रापयामि॥
*(गणपतीला उदबत्तीने ओवाळावे.)*

साज्यम् त्रिवर्ती संयुक्ताम् वह्निना योजितम् प्रियम्।
गृहाणा मंगलम् दीपम् त्रैलोक्यतिमिरावहम्॥
भक्त्यादीपम् प्रयच्छामि देवाय परमात्मने।
त्राहिमाम नरकाद्घोराद् दिव्यज्योति: नमोस्तुते॥

श्री महागणाधिपतये नमः – दीपम् समर्पयामि,
धूप दीपांतरम् आचमनीयम् समर्पयामि ॥
*(गणपतीला निरांजनाने ओवाळावे व पळीने ताम्हणात पाणी सोडावे.)*

## नैवेद्यम्

*(गुळाचा छोटा तुकडा थाळीत ठेवून नैवेद्य दाखवणे.)*
ॐ भू:भूव सुव:, ॐ तत्सवितुरवरेण्यम्, भर्गो: देवस्य धीमही, धियोयोन: प्रचोदयात्।
सत्यम् त्वर्तेन परिषिंचामि *(संध्याकाळी व्रत करत असल्यास* "ऋतं त्वा सत्येन परिषिंचामि" *म्हणावे.)*

श्री महागणाधिपतये नमः – नैवेद्यम् समर्पयामि ॥
अमृतमस्तु अमृतोवत्सरणमसि॥

**ॐ प्राणाय स्वाहा । ॐ आपानाय स्वाहा । ॐ व्यानाय स्वाहा । ॐ उदानाय स्वाहा ।**
**ॐ समानाय स्वाहा मध्ये मध्ये पानीयम् समर्पयामि ॥**

**अमृतापिधानमसि उत्तरापोषणम् समर्पयामि ।**
**हस्तौ प्रक्षालयामि, शुद्धाचमनीयम् समर्पयामि ॥**
**पूगीफलै: सकरपूरै: नागवल्लीदलीरयुतम् ।**
**मुक्ताचुर्ण समायुक्तम् तांबुलम् प्रतिगृह्यताम् ॥**

श्री महागणाधिपतये नमः - तांबुलम् समर्पयामि ॥
*(गणपतीसमोर विड्याची दोन पाने ठेवून त्यावर सुपारी व एक नाणे ठेवावे.)*

**ॐ गणानाम त्वागणपतीम् हवामहे । कविं कवीनामुपा मस्श्रवस्तवम् ।**
**ज्येष्ठराजम् ब्रह्मणाम् ब्रह्मणस्पत । आनश्श्रुण्यनुतिभिः सीदसाधनम् ॥**

श्री महागणाधिपतये नमः - सुवर्णमंत्रपुष्पम् समर्पयामि ॥
*(एक पळी पाणी ताम्हणात सोडावे.)*

मंत्रहीनम् क्रियाहीनम् भक्तिहीनम् गणाधिप ।
यत्पूजितम् मया देव परिपूर्णं तदस्तुते ॥
यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
तेहनाकम् महिमानः सचंते यत्र पुर्वेसाध्याः संति देवाः ॥

## पुनराचमनम्

अनया ध्यानावाहनादि षोडषोपचार पूजया च भगवान सर्वात्मकाः
श्रीमहा गणाधिपति सुप्रीतो वरदो भूत्वा उत्तरे कर्मण्य विघ्नमस्तु भवन्तो ॥
भृवन्तु उत्तरे कर्मण्य विघ्नमस्तु गणाधिपति प्रसादम शिरसा ग्रुह्णामि ।

सहस्रपरमा देवि शतमूला शतांकुरा ।
सर्वं हरतु मे पापं दूर्वादुस्स्वप्ननाशनी ।
गणपति यदास्थानं उद्वासयामि ॥

## प्राण प्रतिष्ठा

ॐ असुनीते पुनर्स्मासु चक्षुः पुनः प्राणमिहनोदेहि भोगं ज्योक्पश्येम ।
सूर्यमुच्चरन्त मनुमते मृडयान स्वस्ति अमृतं वैप्राणा अमृतमापः प्राणानेव यधास्थानमुपह्वयते ॥
*(श्री बालाजीच्या मूर्तीला किंवा फोटोला स्पर्श करावा.)*
श्रीवेंकटेश्वर आवाहयामि, स्थापयामि, पूजयामि स्थिरोभव, वरदोभव सुप्रसन्नोभव, स्थिरासनं कुरु ।

## ध्यानम्

शान्ताकारं भुजगशयनं पद्मनाभम् सुरेशम् ।
विश्वकारम् गगन सदृशं मेघवर्ण शुभांगं ॥
लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिह्रुध्यान गम्यं ।
वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथं ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः - ध्यायामि, ध्यानम समर्पयामि।

## आवाहनम्

आवाहयामि देवेश सिद्धगन्धर्व सेवित । यद्रस्यमिदं पुण्यं सर्वपापहरोहरः ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेन्कटेश्वर स्वामिने नमः - आवाहयामि
*(कलशाला फुले वाहावी.)*

## आसनम्

देव देव जगन्नाथ प्रणुत क्लेशनाशन । रत्नसिंहासनं दिव्यं गृहाण मधुसुदन ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेन्कटेश्वर स्वामिने नमः - रत्नसिंहासनं समर्पयामि

*(कलशाला फुले वाहावी.)*

## पाद्यं

वान्चितं कुरुमेदेव दुष्कृतं च विनाशय । पाद्यं गृहाण भगवान मातुरुत्संग संस्थित ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः - पादयो, पाद्यं समर्पयामि

*(श्रीबालाजीची मूर्ती असल्यास ती ताम्हणात ठेवून त्यावर नाहीतर ताम्हणात एक पळी पाणी सोडावे)*

## अर्घ्यं

कुरुष्वमे दयां देव संसारार्ति भयापह । दधिक्षीर फलोपेतम् गृहाणार्घ्यं नमोस्तुते ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः - हस्तयोरर्घ्यं समर्पयामि

*(मूर्ती असल्यास दुसरया नाहीतर त्याच ताम्हणात एक पळी पाणी सोडावे.)*

## आचमनं

नमः सत्याय शुद्धाय नित्याय ज्ञानरूपिणे । गृहाणाचमनं देव सर्वलोकैकनायक ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः - मुखे आचमनीयं समर्पयामि

*(मूर्ती असल्यास दुसरया नाहीतर त्याच ताम्हणात एक पळी पाणी सोडावे.)*

## पंचामृतस्नानं

पंचामृतं मयानीतं पयोदधिघृतं मधु । शर्करा सहितं चैवदेवत्वं प्रतिगृह्यतां ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः - पंचामृत स्नानं समर्पयामि

*(पंचामृत पळीने मूर्तीवर अथवा मूर्ती नसल्यास ताम्हणात घालावे. गाईच्या दुधात, दही, तूप, मध व साखर घालून पंचामृत बनवतात.)*

## स्नानं

स्वर्णपात्रोदकं गंगा यमुनादि समन्वितं । शुद्धोदकं गृहाणेश स्नानं कुरु यथाविधि ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः - शुद्धोदकस्नानं समर्पयामि

*(एक पळी पाणी मूर्तीवर अथवा मूर्ती नसल्यास ताम्हणात सोडावे. मूर्ती उचलून स्वच्छ कापडाने अथवा टॉवेलने पुसावी व चौरंगावर ठेवावी.)*

## वस्त्रं

तप्तकांचन सन्काशं पीतम्बर मिदं हरे । सुगृहाण जगन्नाथ श्रीनिवास नमोस्तुते ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः - वस्त्रयुग्मं समर्पयामि

*(कापसाचे वस्त्र असल्यास ते श्रीबालाजीच्या मूर्तीला/फोटोला घालावे.)*

## यज्ञोपवीतं

यज्ञोपवीतं परमं पवित्रं प्रजपतेर्यत्सहजं पुरस्तात ।
आयुष्यमाग्रयाम प्रतिमुञ्चशुभ्रं यज्ञोपवीतं बलमस्तु तेजः ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः - यज्ञोपवीतं समर्पयामि
*(जानवी-जोड असल्यास तो श्रीबालाजीच्या मूर्तीला/फोटोला घालावा.)*

## गंधम्

चन्दनागरु कस्तूरि घनसार समन्वितं । गन्धं गृहाण गोविन्द नानागंधस्चधारय ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः - दिव्यपरिमल गंधां समर्पयामि
*(श्रीबालाजीच्या मूर्तीला/फोटोला गंध लावावे.)*

## अक्षतां

गोविन्दा परमानन्द हरिद्रा सहितक्षतान । विश्वेश्वर विशालाक्ष गृहाण परमेश्वर ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः - अक्षतान समर्पयामि
*(श्रीबालाजीच्या मूर्तीला/फोटोला अक्षता वाहाव्या. तांदळाला हळद, कुंकू लावून अक्षता करतात.)*

## पुष्पं

सुगंधानि सुपुष्पाणि जाजीकुन्दमुखानि च । मालति वकुलादेवि पूजार्थं प्रतिगृह्यतां ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः - पुष्पं समर्पयामि
*(श्रीबालाजीच्या मूर्तीला/फोटोला फुले वाहावी.)*

## अथांग पूजा

*(तुळस भरपूर असल्यास खालील प्रत्येक नामाबरोबर श्रीबालाजीच्या मूर्तीला/फोटोला तुळशीची पाने वाहावी. तसेच अष्टोत्तर शत नामावली म्हणताना सुद्धा मधून मधून तुळशीची पाने वाहावी. तुळस नसल्यास फुले वाहावीत.)*

ॐ श्री वेंकटेश्वराय नमः - पादौ पूजयामि ।
ॐ श्री वेंकटचलधिशाय नमः - गुल्फ़ौ पूजयामि ।
ॐ श्री प्रदायकाय नमः - जानुनी पूजयामि ।
ॐ पद्मावती पतये नमः - जंघे पूजयामि ।
ॐ ज्ञानप्रदाय नमः - ऊरू पूजयामि ।
ॐ श्रीनिवसाय नमः - कटिं पूजयामि ।
ॐ महाभागाय नमः - नाभिं पूजयामि ।
ॐ निर्मलाय नमः - उदरं पूजयामि ।
ॐ विशालहृदयाय नमः - हृदयम पूजयामि ।

ॐ परिशुद्धात्मने नमः - स्तनौ पूजयामि ।
ॐ पुरुषोत्तमाय नमः - भुजौ पूजयामि ।
ॐ स्वर्णहस्ताय नमः - हस्तौ पूजयामि ।
ॐ वरप्रदाय नमः - कंठं पूजयामि ।
ॐ लोकनाथाय नमः - स्कन्धौ पूजयामि ।
ॐ सर्वेश्वराय नमः - मुखं पूजयामि ।
ॐ रसज्ञाय नमः - नासिकां पूजयामि ।
ॐ पुण्यश्रवन कीर्तनाय नमः - श्रोत्रे पूजयामि ।
ॐ पुल्लाम्बुज विलोचनाय नमः - नेत्रे पूजयामि ।
ॐ वर्चस्विने नमः - ललाटं पूजयामि ।
ॐ रम्य विग्रहाय नमः - सर्वाण्यन्गानि पूजयामि ।
ॐ श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः - दिव्यसुन्दर विग्रहं पूजयामि ।

## श्री वेंकटेश्वर अष्टोत्तर शतनामावलि

ॐ वेंकटेशाय नमः
ॐ श्रीनिवासाय नमः
ॐ लक्ष्मीपतये नमः
ॐ अनामयाय नमः
ॐ अमृतांशाय नमः
ॐ जगद्वंद्वाय नमः
ॐ गोविन्दाय नमः
ॐ शाश्वताय नमः
ॐ प्रभवे नमः
ॐ शेषाद्रि-निलयाय नमः
ॐ देवाय नमः
ॐ केशवाय नमः
ॐ मधुसुदनाय नमः
ॐ अमृताय नमः
ॐ माधवाय नमः
ॐ कृष्णाय नमः
ॐ श्रीहरये नमः
ॐ ज्ञान-पंजराय नमः
ॐ श्री वत्स-वक्षसे नमः
ॐ सर्वेशाय नमः
ॐ गोपालाय नमः
ॐ पुरुषोत्तमाय नमः
ॐ गोपेश्वराय नमः
ॐ परम-ज्योतिष्ये नमः
ॐ वैकुन्ठपतये नमः
ॐ अव्ययाय नमः
ॐ सुधातनवे नमः
ॐ यादवेन्द्राय नमः
ॐ नित्य-यौवनरूपवते नमः
ॐ चतुर्वेदात्मकाय नमः
ॐ विष्णवे नमः
ॐ अच्युताय नमः
ॐ पद्मिनी-प्रियाय नमः
ॐ धरापतये नमः
ॐ सुरपतये नमः
ॐ निर्मलाय नमः
ॐ देवपूजिताय नमः
ॐ चतुर्भुजाय नमः
ॐ चक्रधराय नमः
ॐ त्रिधाम्ने नमः

ॐ त्रिगुणाश्रयाय नमः
ॐ निर्विकल्पाय नमः
ॐ निष्कलन्काय नमः
ॐ निरांतकाय नमः
ॐ निरन्जनाय नमः
ॐ निराभासाय नमः
ॐ नित्यतृप्ताय नमः
ॐ निर्गुणाय नमः
ॐ निरुपद्रवाय नमः
ॐ गदाधराय नमः
ॐ शारंगपाण्ये नमः
ॐ नन्दकिने नमः
ॐ शन्खधारकाय नमः
ॐ अनेकमुर्तये नमः
ॐ अव्यक्ताय नमः
ॐ कटिहस्ताय नमः
ॐ वरप्रदाय नमः
ॐ अनेकात्मने नमः
ॐ दीनबान्धवे नमः
ॐ आर्तलोक भयप्रदाय नमः
ॐ आकाशराज-वरदाय नमः
ॐ योगि-हृत्पद्ममन्दिराय नमः
ॐ दामोदराय नमः
ॐ जगत्पालाय नमः
ॐ पापघ्नाय नमः
ॐ भक्तवत्सलाय नमः
ॐ त्रिविक्रमाय नमः
ॐ शिंशुमाराय नमः
ॐ जटामुकुट-शोभिताय नमः
ॐ शन्ख-मद्योल-सन्मंजूलाय-किन्किण्याड्य-करन्डकाय नमः
ॐ नीलमेघ-श्याम-तनवे नमः
ॐ बिल्व-पत्रार्चन प्रियाय नमः
ॐ जगद्व्यापिने नमः
ॐ जगत-कर्ते नमः
ॐ जगत-साक्षिणे नमः
ॐ जगत्पतये नमः
ॐ चिन्तितार्थ-प्रदाय नमः
ॐ जिष्णवे नमः
ॐ दाशार्वाय नमः
ॐ दश-रूपवते नमः
ॐ देवकि-नन्दनाय नमः
ॐ शौरये नमः

ॐ हयग्रीवाय नमः
ॐ जनार्दनाय नमः
ॐ कन्या-श्रवणतारेज्याय नमः
ॐ पीताम्बरधराय नमः
ॐ अनघाय नमः
ॐ वनमालिने नमः
ॐ पद्मनाभाय नमः
ॐ मृगयासक्त-मानसाय नमः
ॐ अश्वरूढाय नमः
ॐ खड्गधारिणे नमः
ॐ धनार्जन-समुत्सुकाय नमः
ॐ गानसारल-सन्मध्य-कस्तुरि-तिलकोज्वलाय नमः
ॐ सत्चिदानन्दरूपाय नमः
ॐ जगन्मन्गलदायकाय नमः
ॐ यज्ञरूपाय नमः
ॐ यज्ञभोक्ते नमः
ॐ चिन्मयाय नमः
ॐ परमेश्वराय नमः
ॐ परमार्थ-प्रदाय नमः
ॐ शान्ताय नमः
ॐ श्रीमते नमः
ॐ दोर्दन्ड-विक्रमाय नमः
ॐ परात्पराय नमः
ॐ परब्रह्मणे नमः
ॐ श्रीविभवे नमः
ॐ जगदीश्वराय नमः

**॥ इति श्री वेंकटेश्वर अष्टोत्तर शतनामावलिः ॥**

## श्री महालक्ष्मी अष्टोत्तर शतनामावलि

ॐ प्रकृत्यै नमः
ॐ विकृत्यै नमः
ॐ विद्यायै नमः
ॐ सर्वभूतहितप्रदायै नमः
ॐ श्रद्ध्यै नमः
ॐ विभूत्यै नमः
ॐ सुरभ्यै नमः
ॐ परमात्मिकायै नमः
ॐ वाच्यै नमः
ॐ पद्मालयायै नमः
ॐ पद्मायै नमः
ॐ शुच्यै नमः
ॐ स्वाहायै नमः
ॐ स्वधायै नमः
ॐ सुधायै नमः
ॐ धन्यायै नमः
ॐ हिरण्म्यै नमः
ॐ लक्ष्म्यै नमः
ॐ नित्यपुष्टायै नमः
ॐ विभावर्यै नमः
ॐ आदित्यै नमः
ॐ दित्यै नमः
ॐ दीप्तायै नमः
ॐ वसुधायै नमः
ॐ वसुधारिण्यै नमः
ॐ कमलायै नमः
ॐ कान्तायै नमः
ॐ कामाक्ष्यै नमः
ॐ कमल सम्भवायै नमः
ॐ अनुग्रहप्रदायै नमः
ॐ बुद्ध्यै नमः
ॐ अनघायै नमः
ॐ हरिवल्लभायै नमः
ॐ अशोकायै नमः
ॐ अमृतायै नमः
ॐ दीपायै नमः
ॐ लोकशोक विनाशिन्यै नमः
ॐ धर्मनिलयायै नमः
ॐ करुणायै नमः
ॐ लोकमात्रै नमः
ॐ पद्मप्रियायै नमः

ॐ पद्महस्तायै नमः
ॐ पद्माक्ष्यै नमः
ॐ पद्मसुन्दर्यै नमः
ॐ पद्मोद्भवायै नमः
ॐ पद्ममुख्यै नमः
ॐ पद्मनाभ प्रियायै नमः
ॐ रमायै नमः
ॐ पद्ममालाधरायै नमः
ॐ देव्यै नमः
ॐ पद्मिन्यै नमः
ॐ पद्मगन्धिन्यै नमः
ॐ पुण्यगन्धायै नमः
ॐ सुप्रसन्नायै नमः
ॐ प्रसादाभिमुख्यै नमः
ॐ प्रभायै नमः
ॐ चन्द्रवदनायै नमः
ॐ चन्द्रायै नमः
ॐ चन्द्रसहोदर्यै नमः
ॐ चतुर्भुजायै नमः
ॐ चन्द्ररुपायै नमः
ॐ इन्दिरायै नमः
ॐ इन्दु शीतलायै नमः
ॐ आह्लाद जनन्यै नमः
ॐ पुष्ट्यै नमः
ॐ शिवायै नमः
ॐ शिवकर्त्यै नमः
ॐ सत्यायै नमः
ॐ विमलायै नमः
ॐ विश्वजनन्यै नमः
ॐ तुष्ट्यै नमः
ॐ दारिद्र्यनाशिन्यै नमः
ॐ प्रीति पुष्करिण्यै नमः
ॐ शान्तायै नमः
ॐ शुक्लमाल्याम्बरायै नमः
ॐ भास्कर्यै नमः
ॐ बिल्व निलयायै नमः
ॐ वरारोहायै नमः
ॐ यशस्विन्यै नमः
ॐ वसुन्धरायै नमः
ॐ उदारंग्यै नमः
ॐ हरिण्यै नमः
ॐ हेममालिन्यै नमः

ॐ धन धान्यकर्त्र्यै नमः
ॐ सिद्ध्यै नमः
ॐ स्त्रैण्य सौम्यायै नमः
ॐ शुभप्रदायै नमः
ॐ नृपवेश्म गतानन्दायै नमः
ॐ वरलक्ष्म्यै नमः
ॐ वसुप्रदायै नमः
ॐ शुभायै नमः
ॐ हिरण्य प्राकारायै नमः
ॐ समुद्र तनयायै नमः
ॐ जयायै नमः
ॐ मंगलायै नमः
ॐ विष्णुवक्षः स्थलस्थितायै नमः
ॐ विष्णुपत्न्यै नमः
ॐ प्रसन्नाक्ष्यै नमः
ॐ नारायण समाश्रितायै नमः
ॐ दारिद्र्य ध्वंसिन्यै नमः
ॐ देवलक्ष्मै नमः
ॐ सर्वोपद्रव निवारिण्यै नमः
ॐ नवदुर्गायै नमः
ॐ महाकाल्यै नमः
ॐ ब्रह्मा-विष्णु-शिवात्मिकायै नमः
ॐ त्रिकालज्ञानसम्पन्नायै नमः
ॐ भुवनेश्वर्यै नमः

॥ इति श्री लक्ष्मी अष्टोत्तर शतनामावलिः ॥

# श्री पद्मावती अष्टोत्तर शतनामावलि

ॐ पद्मावत्यै नमः
ॐ देव्यै नमः
ॐ पद्मोद्भवायै नमः
ॐ करुणाप्रदायिन्यै नमः
ॐ सहृदयायै नमः
ॐ तेजस्वरूपिण्यै नमः
ॐ कमलमुख्यै नमः
ॐ पद्मधरायै नमः
ॐ श्रीयै नमः
ॐ पद्मनेत्र्यै नमः
ॐ पद्मकरायै नमः
ॐ सुगुणायै नमः
ॐ कुमकुमप्रियायै नमः
ॐ हेमवर्णायै नमः
ॐ चन्द्रवन्दितायै नमः
ॐ धगधगप्रकाश शरीर-धारिण्यै नमः
ॐ विष्णुप्रियायै नमः
ॐ नित्यकल्याण्यै नमः
ॐ कोटिसूर्यप्रकाशिण्यै नमः
ॐ महासौन्दर्यरूपिण्यै नमः
ॐ भक्तवत्सलायै नमः
ॐ ब्रह्माान्डवासिन्यै नमः
ॐ सर्ववान्चाफलदायिन्यै नमः
ॐ धर्मसन्कल्पायै नमः
ॐ दाक्षिण्यकटाक्षिण्यै नमः
ॐ भक्तिप्रदायिन्यै नमः
ॐ गुणत्रयाविवर्जितायै नमः
ॐ कलाषोडशसंयुतायै नमः
ॐ सर्वलोकानान्जनन्यै नमः
ॐ मुक्तिदायिन्यै नमः
ॐ दयामृतायायै नमः
ॐ प्रज्ञायै नमः
ॐ महाधर्मायै नमः
ॐ धर्मरूपिण्यै नमः
ॐ अलन्कार प्रियायै नमः
ॐ सर्वदारिद्र्यध्वंसिन्यै नमः
ॐ श्रीवेंकटेशवक्षस्थलस्थितायै नमः
ॐ लोकशोकविनाशिन्यै नमः
ॐ वैष्णव्यै नमः
ॐ तिरुचानूरुपुरवासिन्यै नमः
ॐ वेदवैद्यविशारदायै नमः

ॐ विष्णुपादसेवितायै नमः
ॐ रत्नप्रकाशकिरीटधारिण्यै नमः
ॐ जगन्मोहिन्यै नमः
ॐ शक्तिस्वरूपिण्यै नमः
ॐ प्रसन्नोदयायै नमः
ॐ इन्द्रादिदैवत यक्षकिन्नर किम्पुरुष पूजितायै नमः
ॐ सर्वलोकनिवासिन्यै नमः
ॐ भूजयायै नमः
ॐ ऐश्वर्यप्रदायिन्यै नमः
ॐ शान्तायै नमः
ॐ उन्नतस्थानस्थितायै नमः
ॐ मन्दारकामिन्यै नमः
ॐ कमलाकरायै नमः
ॐ वेदान्तज्ञानरूपिण्यै नमः
ॐ सर्वसम्पत्तिरूपिण्यै नमः
ॐ कोटिसूर्यसमप्रभायै नमः
ॐ पूजाफलदायिन्यै नमः
ॐ कमलासनादि सर्वदेवतायै नमः
ॐ वैकुन्ठवासिन्यै नमः
ॐ अभयदायिन्यै नमः
ॐ द्राक्षाफलपायसप्रियायै नमः
ॐ नृत्यगीतप्रियायै नमः
ॐ क्षीरसागरोद्भवायै नमः
ॐ आकाशराज पुत्रिकायै नमः
ॐ सुवर्णहस्तधारिण्यै नमः
ॐ कामरूपिण्यै नमः
ॐ करुणाकटाक्षधारिण्यै नमः
ॐ अमृतासुजायै नमः
ॐ भूलोकस्वर्गसुखदायिन्यै नमः
ॐ अष्टदिक्पालकाधिपत्यै नमः
ॐ मन्मधदर्प संहारिण्यै नमः
ॐ कमलार्थभागायै नमः
ॐ स्वल्पपराध-महापराध-क्षमायै नमः
ॐ शतकोटितीर्थवासितायै नमः
ॐ नारदादि मुनिश्रेष्ठ पूजितायै नमः
ॐ आदिशन्करपूजितायै नमः
ॐ प्रीतिदायिन्यै नमः
ॐ सौभाग्यप्रदायिन्यै नमः
ॐ महाकीर्ती प्रदायिन्यै नमः
ॐ कृष्णातिप्रियायै नमः
ॐ गन्धर्व शापविमोचकायै नमः
ॐ कृष्णपत्न्यै नमः

ॐ त्रिलोकपूजितायै नमः
ॐ जगन्मोहिन्यै नमः
ॐ सुलभायै नमः
ॐ सुशीलायै नमः
ॐ अंजनासुतानुग्रहप्रदायिन्यै नमः
ॐ भक्त्यात्मनिवासिन्यै नमः
ॐ संध्यावन्दिन्यै नमः
ॐ सर्वलोकमात्रै नमः
ॐ अभिमतदायिन्यै नमः
ॐ ललितावधूत्यै नमः
ॐ समस्तशास्त्र विशारदायै नमः
ॐ सुवर्णाभरणधारिण्यै नमः
ॐ इहपरलोक सुखप्रदायिन्यै नमः
ॐ करवीरनिवासिन्यै नमः
ॐ नागलोकमणिसह आकाशसिन्धु कमलेश्वर पूरितरधगमनायै नमः
ॐ श्री श्रीनिवासप्रियायै नमः
ॐ चन्द्रमन्डलस्थितायै नमः
ॐ अलिवेलु मन्गायै नमः
ॐ दिव्यमन्गल धारिण्यै नमः
ॐ सुकल्याणपीठस्थितायै नमः
ॐ कामकवनपुष्पप्रियायै नमः
ॐ कोटि मन्मधरूपिण्यै नमः
ॐ भानुमन्डलरूपिण्यै नमः
ॐ पद्मपादायै नमः
ॐ रमायै नमः
ॐ सर्वलोकसभान्तर धारिण्यै नमः
ॐ सर्वमानसवासिन्यै नमः
ॐ सर्वायै नमः
ॐ विश्वरूपायै नमः
ॐ दिव्यज्ञानायै नमः
ॐ स्वमन्गलरूपिण्यै नमः
ॐ सर्वानुग्रहप्रदायिन्यै नमः
ॐ ॐकारस्वरूपिण्यै नमः
ॐ ब्रह्मज्ञानसंभूतायै नमः
ॐ श्री पद्मावत्यै नमः
ॐ सद्योवेदवत्यै नमः
ॐ श्रीमहालक्ष्म्यै नमः

॥ इति श्री पद्मावती अष्टोत्तर शतनामावलिः ॥

## धूपम्

दशांगम् गुग्गुलोपेतं गोघृतेन समन्वितम् । धूपं गृहाण देवेश सर्वलोक नमस्कारा ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः – धूपमाघ्रापयामि

*(श्रीबालाजीच्या मूर्तीला/फोटोला उदबत्तीने ओवाळावे.)*

## दीपम्

त्रिलोकेश महादेव सर्वज्ञान प्रदायक । दीपं दास्यामि देवेश रक्षमाम भक्तवत्सल ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः – दीपं दर्शयामि

*(श्रीबालाजीच्या मूर्तीला/फोटोला निरांजनाने ओवाळावे.)*

## नैवेद्यम्

सर्वभक्षैश्च भोज्जैश्च रसै षडभिः समन्वितं । नैवेद्यन्तु मयानीतम गृहाण पुरुषोत्तम ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः – नैवेद्यं समर्पयामि

*(श्रीबालाजीला नैवेद्य दाखववा. केळयासाठी* "कदलीफल निवेदयामि*", नारळासाठी* "नारिकेल फलं निवेदयामि*", गुळ असेल तर* "गुडोपहार नैवेद्यम् समर्पयामि*" म्हणावे.)*

ॐ प्राणाय स्वाहा, ॐ आपानाय स्वाहा, ॐ व्यानाय स्वाहा, ॐ उदनाय स्वाहा, ॐ समानाय स्वाहा, ॐ परब्रह्मणे स्वाहा, ॐ भूर्भुवः सुवः तत्सवितुर–वरेण्यम भर्गो देवस्य धीमहि, धियो यो नः प्रचोदयात, ॐ आपो ज्योतिरसोमृतं ब्रह्म भूर्भुवः स्वरोम मध्ये मध्ये पानीयम् समर्पयामि
अमृतापिधानमसि, उत्तरापोशनम समर्पयामि, हस्तौ प्रक्षालयामि, पादौ प्रक्षालयामि, पुनराचमनीयम समर्पयामि.

*(एक पळी पाणी ताम्हणात सोडावे.)*

## ताम्बूलम्

पूगीफलैः सकर्पूरैः नागवल्लीदलैर्युतं । मुक्ताचूर्ण समायुक्तं ताम्बूलं प्रतिगृह्यतां ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः – ताम्बूलम समर्पयामि.

*(श्रीबालाजीसमोर विड्याची दोन पाने ठेवून त्यावर सुपारी व एक नाणे ठेवावे.)*

## नीराजनम्

श्रियेः कान्ताय कल्याण निधये निधयेर्धिनाम । श्रीवेंकटनिवासाय श्रीनिवासाय मन्गलम् ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः नीराजनम् दर्शयामि।

*(श्रीबालाजीच्या मूर्तीला/फोटोला निरांजनाने ओवाळावे.)*

पुनराचमनीयम् समर्पयामि। *(एक पळी पाणी ताम्हणात सोडावे.)*

## मंत्रपुष्पम्

ॐ सहस्त्रशीर्षम देवं विश्वाक्षं विश्वशंभुवं विश्वं नारायणन्देवम् अक्षरं परमं पदं ॥१॥
विश्वतः परमान्नित्यं विश्वं नारायणं हरिं विश्वमेवेदं पुरुषस्तद्विश्वं उपजीवति ॥२॥
पर्तिं विश्वस्यात्मेश्वरं शाश्वतं शिवमच्युतं नारायणं महाज्ञेयं विश्वत्मानं परायणं ॥३॥
नारायण परोज्योतिः आत्मा नारायणः परः नारायण परम् ब्रह्म तत्वम् नारायणः परः
नारायण परो ध्याता ध्यानम् नारायणः परः ॥४॥

यच्च किन्चित् जगत्सर्वं दृश्यते श्रुयतेपि वा अन्तर्बहिश्चतत्सर्वम् व्याप्या नारायणः स्थितः ॥५॥
अनन्तम् अव्ययम् कविं समुद्रेन्तम् विश्वशम्भुवम् पद्मकोश प्रतीकाशम् हृदयम् चाप्यधोमुखम् ॥६॥
अधोनिषत्या वितस्त्यान्ते नाभ्यामुपरि तिष्ठति। ज्वालामालाकुलंभाति विश्वस्यायातनम् महत॥७॥
सन्ततं शिलाभिस्तु लंबत्याकोशसन्निभम् तस्यान्ते सुशिरं सूक्ष्मम् तस्मिन् सर्वम् प्रतिष्ठितम्॥८॥
तस्यमध्ये महान् अग्निः विश्वारचिर्विश्वतो मुखः सोग्रभूग्विभजन् तिष्ठान्नाहार मजरः कविः
तिर्यगूर्ध्वा मधश्शायीरश्मया स्तस्य सन्तता ॥९॥
संतापयति स्वं देह मापादतलमस्तकः तस्य मध्ये वन्हि शिखा अणीयोर्ध्वा व्यवस्थितः ॥१०॥
नीलथो यदमध्यस्ता विद्युल्लेखेव भास्वरा नीवारशूकवत्तन्वी पीताभा स्वत्यनूपमा ॥११॥
तस्याः शिखाया मध्ये परमात्मा व्यवस्थितः स ब्रह्म स शिव स हरि स इन्द्र सोक्षरः परमास्वरात् ॥१२॥

ॐ तद ब्रह्म, ॐ तद वायुः, ॐ तदात्मा, ॐ तत्सत्यम, ॐ तत्सर्वम, ॐ तत्पुरोर्नमः
अन्तश्चरति भूतेषु गुहायाम् विश्वमूर्तिषु त्वम् यज्ञस्त्वम् वषट्कारस्त्वम् इन्द्रस्त्वम् रुद्रस्त्वम्
विष्णुस्त्वम् ब्रह्मत्वम् प्रजापतिः त्वम् तदाप आपो ज्योति रसोवृतम् ब्रह्म भूर्भुवस्सुवरोम ॥१३॥
गदा पुनः शंखरथान्गकल्पक ध्वजारविंदांकुश वज्रलाश्चित हे! श्रीनिवास त्वत् चरणाम्बुज द्वयं मदीय
मूर्धान मलज ॐ निरंजनाय विद्महे निराभासाय धीमहि तन्नो श्रीनिवासः प्रचोदयात्
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः – दिव्यमन्त्रपुष्पं समर्पयामि

## प्रदक्षिण नमस्कारः

श्लोकं: यानिकानि च पापानि जन्मान्तर कृतानि च । तानि तानि प्रणश्यन्ति प्रदक्षिण पदे पदे ॥ पापोहम् पापकर्माहम् पापात्मा पापसंभवः । त्राहिमाम कृपमया देव शरणगतवत्सल ॥ अन्यधा शरणं नास्ति त्वमेव शरणं मम । तस्मात कारुण्य भावेन रक्ष रक्ष जनार्दन ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः – आत्मप्रदक्षिण नमस्कारान् समर्पयामि

## विविधोपचार पूजा

छत्रं धारयामि । चामरं वीजयामि । नृत्यं दर्शयामि । गीतं श्रावयामि । वाद्यं घोषयामि । आंदोलिकान आरोहयामि । आश्वानारोहयामि । गजानारोहयामि । समस्त रजोपचार, शक्त्युपचार, यन्त्रोपचार, देवोपचार, सर्वोपचार पूजां समर्पयामि ॥

## प्रथम अध्याय
## श्री भगवान उवाच

कलियुगात एके दिवशी शुभमुहुर्तावर तिरुमला पहाडावर (याला पृथ्वीतलावरचा वैकुंठ म्हटले जाते.) "विश्वपति" नामक एका भक्तावर श्री बालाजीची कृपा झाली. श्रीविष्णुचे अवतार श्रीबालाजी (वेंकटेश्वर) येथे श्रीनिवासाच्या रूपात पूजले जातात. त्यांनी विश्वपतिला "श्री बालाजी व्रत कथा" नावाने प्रसिध्द अशा या पुस्तिकेची रचना करण्याची आज्ञा दिली. आणि म्हणाले– "हे माझ्या प्रिय भक्त विश्वपति, तू माझा प्रिय भक्त आहेस म्हणून मी तुला हे व्रत विस्ताराने सांगतो. ऐक, हे व्रत मला सर्वात जास्त आवडते. सोपे असल्याने कोणीही सहज संपन्न करु शकतो.

या कलियुगात मानव आपल्या पापकर्मांची फळे भोगतो. अनेक कष्ट सोसून जीवन निर्वाहित करतो. काही भक्तगण आपली दुःखे मला सांगून ती दूर करण्याची प्रार्थना करतात. बरेच पैसे खर्च करुन ते माझ्या दर्शनासाठी तिरुमला–यात्रा करतात. माझ्या भक्तांवर माझे खूप प्रेम आहे. ते त्यांचा सारा भार माझ्यावर टाकतात. मी त्यांना धर्माचा मार्ग दाखवतो.

आता जी व्रतकथा मी तुला सांगतो आहे ती "श्री बालाजीची व्रतकथा" या नावाने प्रसिद्ध होईल. हे माझे व्रत मला सर्वाधिक प्रिय आहे. जो कोणी भक्तिभावाने व निष्ठेने व्रत करेल त्याच्यावरील संकटांचा ताबडतोब नाश होईल. कोणीही व्यक्ति कधीही हे व्रत संपन्न करु शकतो. प्रामुख्याने मार्गशीर्ष, माघ, कार्तिक महिन्यात पौर्णिमा, पंचमी, सप्तमी, एकादशी तिथींना किंवा श्रवण अथवा स्वाति नक्षत्रांच्या दिवशी ह्या व्रताची फलश्रुती अधिक आहे.

या घोर कलियुगात कष्टप्रद जीवन जगत असलेल्या भक्तांना मी ओळखून आहे. तुम्ही कधी दुःखीकष्टी असाल, काही समस्या असेल, स्वास्थ्य ठीक नसेल, नोकरी, व्यापारात अडचणी असतील, मन अस्वस्थ असेल तर हे व्रत संपन्न करावे. त्यायोगे सारे कष्ट दूर होतात. घरातील शुभकार्य निर्विघ्नपणे तडीस जाण्यासाठी हे व्रत जरूर करावे. या व्रताने सारी सुखे प्राप्त होतात. अष्ट ऐश्वर्ये हात जोडून उभी राहतात.

हे व्रत प्रातःकाळी अथवा सायंकाळी संपन्न करता येते. आपल्या घरी वा मुक्कामी, मंदिरात वा कुठल्याही पवित्र स्थानी, नदीकाठी हे व्रत संपन्न करता येते. या व्रताच्या पाचही अध्यायांचे भक्तिभावाने वाचन करावे.

शक्यतो मित्र–परिवारासमवेत हे व्रत करण्याने अधिक पुण्य लाभते. हे व्रत करणारया व्यक्तीला, व्रत ऐकणारया व्यक्तीला तसेच व्रत पूर्ण झाल्यावर भक्तिभावाने प्रसाद ग्रहण करणारयाला, अष्ट ऐश्वर्ये मिळतात. यापूर्वीही माझ्या अनेक भक्तांनी, मुनींनी हे व्रत करुन माझा आशीर्वाद घेतला आहे. सर्व भूलोकवासींना हे व्रत आनंदप्रद व शुभफलदायी आहे. शांत चित्ताने माझे नामस्मरण करत या व्रताचे पालन करा.

सर्व प्रथम पूजा करण्याची जागा स्वच्छ करावी. छोटा मंडप मांडून त्यात माझ्याबरोबर श्री देवी, भूदेवी असलेली तस्वीर प्रस्थापित करावी. मंडप भिंतीला लागून ठेवला तरी चालेल. आपल्या कुलदेवतांच्या तस्वीरी पूजेत ठेवाव्या. नवग्रह व अष्टदिक्पालकांना मनोमन नमस्कार करावा किंवा शक्य असल्यास त्यांना आवाहनही करावे.

सर्वात आधी हळदीच्या गणेशमूर्तीची पूजा करावी. त्यानंतर व्रताच्या पाचही अध्यायांचे निष्ठेने वाचन करावे. हाच पहिला अध्याय आहे. अन्य चार अध्याय माझ्या अत्यंत प्रिय विश्वामित्र, वशिष्ठ, भरद्वाज, अत्रि मुनिश्वरांच्या प्रवचनाच्या रुपात आहेत. प्रत्येक अध्यायाच्याशेवटी गोविंद, गोविंद, गोविंद असे तीन वेळा नामस्मरण करावे. पाचही अध्याय वाचल्यानंतर माझ्या आवडीच्या श्लोकांचे पठण करावे.

सामान्य लोकांच्या कष्टांची जाणीव मला आहे. त्यामुळे आणखी एक गोष्ट लक्षात ठेवा, जर काही ना काही कारणाने हे व्रत विस्ताराने संपन्न करणे अशक्य झाल्यास माझ्या तस्वीरीला समोर ठेवून प्रथम गणेशपूजन करुन नंतर नवग्रह व अष्टदिक्पालकांना नमस्कार करावा, शेवटी पाच अध्याय वाचून तुमची मनोकामना मला सांगा. मी ती इच्छा प्रसादाच्या रुपात पूर्ण करीन. अशा प्रकारे कार्यसिद्धि होईल. तुमचे सारे कष्ट दूर होऊन शुभफलही प्राप्त होईल.

जो कोणी हे व्रत भक्तिभावाने संपन्न करेल, मी त्याच्या घरी कुठल्या ना कुठल्या रूपात येऊन प्रसाद स्वीकारीन. माझी तुम्हा सर्वांवर अशीच कृपा सदैव राहील. श्रीबालाजीने तिम्मुराज विश्वपति रामकृष्णमूर्ति "विश्वपति"ला ही व्रतकथा विस्तारपूर्वक सांगितली. आपण सारे कलियुगवासी हे व्रत करुन श्री बालाजीची कृपा प्राप्त करु शकतो. आपले सारे कष्ट दूर करु शकतो व उचित फलही प्राप्त करु शकतो.

## गोविंद...गोविंद...गोविंद

### प्रथमोध्याय समाप्तं।

श्रिय: कांताय कल्याण निधये निधयेर्थिनाम् ।
श्री वेंकटनिवासाय श्रीनिवासाय मंगलम् ॥

## द्वितीय अध्याय
## श्री विश्वामित्र उवाच

महातप:संपन्न साक्षात् श्री विश्वामित्र ऋषींनी आपल्यावर कृपाहस्त ठेवून त्यांच्या प्रवचनातून सांगितले- "हे कलियुगवासींनो! श्रीनिवासाच्या भक्तांनो! "श्रीबालाजी व्रत कथा" या पवित्र व्रताचा महिमा थोर आहे. हे व्रत म्हणजे कलियुगात श्रीनारायणाची करुणा व दया मिळवण्याचा अत्यंत सुलभ मार्ग आहे. प्राचीन काळात श्रीबालाजीच्या प्रिय भक्तांनी हे व्रत संपन्न करुन त्यांच्या मनोकामना पूर्ण केल्या. ह्या व्रताची आपल्याला माहिती देऊन श्रीबालाजीने आपल्यावर जी दया दाखवली आहे त्याबद्दल त्यांना साष्टांग नमस्कार.

प्राचीन काळात मगध राज्यात एक विष्णुचित्त नावाचा भक्त रहात असे. त्याला नऊ कन्यारत्ने होती. विद्वान असूनही तो अत्यंत गरीब होता. विवाहादि शुभकार्ये करुन आलेल्या दक्षिणेतून कसाबसा निर्वाह करत होता. विष्णुचित्तची पत्नी तारामति नेहमी नारायणाची प्रार्थना करायची. मुली वयात आलेल्या बघून तारामति सदैव त्यांच्या विवाहाच्या काळजीत पडायची. ती सारा वेळ बालाजीच्या सेवेत घालवायची.

बालाजी आपल्या भक्तांवर अत्याधिक प्रेम करतात आणि तारामति तर बालाजी-भक्त होती. त्या दिवशी माघ पौर्णिमा होती. सकाळी एका वृद्ध ब्राह्मणाने विष्णुचित्तचा दरवाजा ठोठावला आणि म्हणाला, "हे स्वामी, मी बंग देशचा रहिवासी आहे. एका यज्ञाच्या निमित्ताने दुसरया देशात चाललो आहे. माझ्यावर दया कर आणि आजचा दिवस मला आपल्या घरी आश्रय दे, मी उद्या सकाळीच मार्गक्रमणा करीन." ते ऐकून विष्णुचित्त म्हणाला, "नाथ, ही तर चांगलीच गोष्ट आहे. अतिथि साक्षात् नारायण असतो असे आपल्या पुराणांत म्हटलेच आहे. आपण निःसंकोचपणे आमच्या घरी राहू शकता." असे म्हणून त्याने ब्राह्मणाला घरात बोलावून त्याचा यथोचित आदरसत्कार केला.

दुपारच्या भोजनानंतर त्या वृद्ध ब्राह्मणाने तारामतिला विचारले- "माते, तुझा चेहरा काळजीने झाकोळला आहे, कसली चिंता करते आहेस? मोकळेपणाने मला सांग." तारामति म्हणाली, "स्वामी, आपण तर महातपस्वी आहात, आपल्या मुखावरचे तेज त्या वैकुंठवासीच्या मुखाप्रमाणे आहे. आपल्यापासून काय लपवू? मला माझ्या मुलींच्या विवाहाची चिंता आहे." त्यावर वृद्ध ब्राह्मण म्हणाला, "माते! तुझे दु:ख मला कळले. तुझे सगळे कष्ट दूर होतील आणि तुझ्या मुलींचे विवाह होतील. मी एक अद्‌भुत व्रत सांगतो, ऐक, हे व्रत संपन्न केल्याने तुझ्या सगळ्या चिंता दूर होतील. श्री बालाजीच्या व्रतांमध्ये हे सगळ्यात सोपे व्रत आहे." असे म्हणून त्याने त्या दांपत्याला व्रताची पूर्ण माहिती दिली. व्रताची कहाणी ऐकून विष्णुचित्त म्हणाला, "स्वामी, ही तर अत्यंत आनंदाची गोष्ट आहे, अहो भाग्य आमचे! म्हणतात ना, 'शुभस्य शीघ्रं'. आज माघ पौर्णिमा आहे, अतिशय शुभ दिन आहे. आपल्या कथेनुसार आपण आजच हे व्रत करु." विष्णुचित्तने पत्नी तारामति आणि आपल्या सर्व मुलींबरोबर त्या दिवशी संध्याकाळीच बंधु-मित्रांना बोलावून भक्तिभावाने बालाजी व्रत संपन्न केले. आलेल्या सर्व लोकांनी व्रत पूर्ण झाल्यावर चरणामृत, प्रसाद ग्रहण केला आणि आपापल्या घरी परतले. त्यानंतर विष्णुचित्त व तारामतिने ब्राह्मणाला नमस्कार करुन त्याचा आशीर्वाद घेतला. ब्राह्मणोत्तमानेही चरणामृत, प्रसाद ग्रहण केला व म्हणाला, "तुमची मनोकामना पूर्ण होवो. श्री लक्ष्मी, श्री बालाजीची तुमच्यावर सदैव कृपा असो."

अंधार पडू लागला. विष्णुचित्त वृद्ध ब्राह्मणाला एक फाटकी-तुटकी चादर देत साश्रू नयनांने म्हणाला, "स्वामी! मी अत्यंत दरिद्री आहे, यापेक्षा चांगली चादर माझ्याकडे नाही, मला क्षमा करा, आजची रात्र यावर विश्राम करावा." ब्राह्मण हसून म्हणाला, "ठीक आहे, मी बाहेर पडवीत झोपतो." काहीवेळातच सगळे झोपेच्या आधीन झाले.

मध्य रात्रीच्या सुमारास विजेच्या कडकडाटासह पाऊस आला. चहूकडे अंधार होता... काही दिसत नव्हते. विष्णुचित्त चिंतेत पडला की बाहेर वृद्ध ब्राह्मण कसा झोपू शकत असेल. त्यावेळी काही सुचतही नव्हते. त्याने कशीबशी रात्र जागून काढली... सकाळ झाली... पाऊसही थांबला होता. पति-पत्नी याच विचारात होते की ब्राह्मणाची काय हालत झाली असेल, किती सोसायला लागले असेल. त्या नादातच ते बाहेर आले, आणि त्यांना एक अद्‌भुत दृश्य दिसले... तिथे विप्रोत्तम नव्हते, फाटक्या चादरीच्या जागी एक रेशमी पितांबर होते व त्यावर "श्री बालाजीची मूर्ती" होती. सगळा प्रकार त्यांच्या लक्षात आला. त्यांच्या खुशीला पारावार राहिला नाही. त्यांच्या घरी आलेला ब्राह्मण दुसरा-तिसरा कोणी नसून साक्षात् श्री नारायणच होते.... हे बालाजी! काय आमचे भाग्य हे... आम्ही त्यांना ओळखू शकलो नाही...आम्ही फाटकी-तुटकी चादर झोपायला दिली? श्री बालाजीची मूर्ती उचलून कपाळाला लावत ते घरात आले... सारे घर सोन्याने भरले होते. जिथे बघावे तिथे धनाच्या राशी. हे भगवान! श्री बालाजी व्रतकथेचा हा महिमा. त्यामुळेच हे शक्य झाले, असे म्हणत ते देवाची स्तुती करु लागले.

आपण पाहिलेत, साक्षात् श्री बालाजी त्या भक्ताच्या घरी गेले, व्रत सांगितले आणि चरणामृत, प्रसादही ग्रहण केला. श्री बालाजी अतिशय करुणामयी आहेत. जो कोणी हे व्रत भक्ति व निष्ठेने करेल, त्याच्या घरी स्वयं भगवान कोणत्या ना कोणत्या रुपात प्रगट होतात. आपण सर्वजण हे व्रत करुन देवाची कृपा प्राप्त करु शकतो.

याप्रामाणे श्री महर्षि विश्वामित्रांनी ही द्वितीय कथा सांगितली.

'श्री लक्ष्मी श्रीनिवास कटाक्षं सिद्धिरस्तु'।

## गोविंद...गोविंद...गोविंद

## द्वितीयोध्याय: समाप्तं

श्रिय: कांताय कल्याण निधये निधयेर्धिनाम् ।
श्री वेंकटनिवासाय श्रीनिवासाय मंगलम्॥

## तृतीय अध्याय

### श्री वशिष्ठ उवाच

हा अध्याय महातपोनिष्ठ वरिष्ठ श्रीवशिष्ठ मुनिंनी श्रीनारायणाच्या कृपेने आपल्याला विस्ताराने सांगितला आहे. "हे कलियुगवासींनो, श्रीबालाजीच्या प्रिय भक्तांनो, आजच्या तिरूमला पहाडावर वास्तव्य करणारे श्रीबालाजी प्रत्यक्ष वैकुण्ठनिवासी श्रीनारायणच आहेत. कलियुगवासींचे कष्ट दूर करण्यासाठी ते तुमच्यासमीप तिरुमला पहाडावर अवतरले आहेत. श्रीबालाजीला खूष करण्यासाठी हे व्रत उत्तम आहे तसेच ते सोपेही आहे. जो कोणी हे व्रत भक्तिभावाने करतो त्याला सर्व सुखे मिळतात.

प्राचीन काळी अवंती देशात भाग्यनगर नामक एक नगर होते. नावाप्रमाणेच तेथे अनेक धनवान व्यापारी राहत होते. पण त्यांना त्यांच्या संपत्तीचा गर्व झाला होता व सामान्य लोकांकडे ते हीन दृष्टीने बघत असत. त्यांच्याकडे असलेली धन-दौलत त्यांची स्वार्जित आहे असे मानून त्याबद्दल त्यांच्या मनात घमेंड होती. परमेश्वराचा नित्य पूजा-पाठ तर त्यांनी कधीच सोडून दिला होता. सणासुदीच्या दिवशीसुद्धा ते मंदिरात जात नव्हते, पूजा करत नव्हते, एवढेच नव्हे तर देवापुढे साधा एक दिवा सुद्धा लावत नव्हते. एक दिवस सगळे धनवान आपापल्या बायकांबरोबर प्रीतिभोजनात दंग होते. त्या नगराच्या पूर्वेकडे असलेल्या श्री लक्ष्मी-नारायणाच्या मंदिरात दिवा लावायला कोणी गेले नाही. त्यादिवशी विशेष एकादशी होती, ज्याला एक पर्व दिनही मानले जाते. पण त्या नगरातल्या एकाही धनवानाला मंदिरात जाऊन पूजा करण्याचा विचार शिवला नाही. संध्याकाळ होता-होता आकाशात काळे काळे ढग जमले आणि मुसळधार पाऊस पडू लागला. व्यापारी लोकांची घरे पाण्याने भरली. चारी बाजूला अंध:कार पसरला. सकाळ होईपर्यंत पूर्ण नगर पाण्याखाली गेले. व्यापारयांची घरे कोसळली. त्यांचे सारे ऐश्वर्य वाहून गेले. असा प्रलय का झाला? एवढा उत्पात का माजला?...कुणाला काहीच कळत नव्हते. इतक्यात, त्यांना एक विचित्र दृश्य दिसले. नगराच्या बाहेर ज्या झोपड्या होत्या त्या तशाच राहिल्या होत्या. पुराचे पाणी त्यांच्यापर्यंत पोचलेच नव्हते. त्यांना आश्चर्य वाटले... एवढ्या पावसातही या कश्या व्यवस्थित राहिल्या?... ते असे मनात म्हणत आहेत तोवर वीज कडाडली, आकाशवाणी झाली "अरे मुर्खांनो, तुम्हाला तुमच्या संपत्तिचा गर्व झाला, तुम्हाला ती स्वार्जित वाटू लागली, म्हणून असे झाले... या झोपडीत राहणारा देव माझा प्रिय भक्त आहे. सर्वसामान्य असूनही देव नियमितपणे तुमच्या नगरातल्या श्रीलक्ष्मी-नारायणाच्या मंदिरात दिवा लावायचा. इतकेच नाही तर दर एकादशीला यथाशक्ति श्री बालाजी व्रत करायचा, म्हणून या झोपड्यांचे सारे रहिवासी सुरक्षित राहिले. तुम्ही जर सगळयानी हे व्रत संपन्न केलेत तर आपापले ऐश्वर्य पुनः प्राप्त करु शकाल." आकाशवाणी ऐकताच ते सारेजण मंदिरात जाऊन जसे शक्य झाले तसे एकमेकांच्या सहयोगाने श्रीबालाजी व्रत संपन्न केले. असे करताच सर्वांना आपापली घरे पूर्व रुपात मिळाली. तेव्हापासून ते सगळेजण श्रीबालाजीचे भक्त बनले व प्रत्येक एकादशीला बालाजीचे व्रत करु लागले. त्याद्वारे सुख-शांति प्राप्त करुन राहू लागले. शेवटी मुक्तिही मिळवली.

श्रीवशिष्ठमुनींनी या प्रकारे ही कथा ऐकवली.

गोविंद...गोविंद...गोविंद

तृतीयोध्यायः समाप्तं |

श्रियः कांताय कल्याण निधये निधयेर्धिनाम् । श्री वेंकटनिवासाय श्रीनिवासाय मंगलम्॥

## चतुर्थ अध्याय
### श्री भरद्वाज उवाच

श्रीनारायणाला "श्रीबालाजी व्रत कथा" अत्यंत प्रिय आहे. चतुर्थ अध्यायाच्या रूपात श्रीभरद्वाज मुनिद्वारा सांगितलेली कहाणी ही अशी – "हे कलियुगवासींनो, श्रीनारायणाच्या प्रिय भक्तांनो, आपण जे व्रत करत आहात ते अद्‌भुत आहे. आपल्या सर्व मनोकामना पूर्ण करण्याचा साधा उपाय आहे. श्रीबालाजीला प्रसन्न करण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे. आपल्या सगळयांवर कृपा करण्यासाठीच वैकुंठवासी विष्णू श्रीनिवासाच्या रूपात तिरुमला पहाडावर अवतरले आहेत. अनेक जन्मांच्या पुण्यानेच तिरुमला पहाडावर पाऊल ठेवण्याचे सौभाग्य प्राप्त होते, व परमेश्वराचे दर्शन होते. तसेच हे "व्रत" संपन्न करण्याचा संकल्पसुद्धा पूर्वजन्मीच्या पुण्यानेच केला जातो. ज्या व्यक्ति हे व्रत संपन्न करतात, किंवा या कथा ऐकतात, अथवा देवाचा प्रसाद ग्रहण करतात त्यांना परमेश्वराची कृपा प्राप्त होते व ते भाग्यशाली होतात.

प्राचीन काळी "नगरी" नावाच्या एका गावात धनगुप्त नामक व्यापारी राहत असे. तो अतिशय लोभी होता. ऐश्वर्य मिळूनही त्याचा लोभीपणा कमी झाला नाही. हे सारे ऐश्वर्य स्वकर्तृत्वाने मिळाले आहे असे समजून तो खूप घमेंड करायचा. अहंकार मनुष्याचा नाश करतो.

धनगुप्तची पत्नी कांतिमती अत्यंत भक्तिभावाने परमेश्वराची पूजा करायची. त्यांना तीन कन्यारत्ने होती. तिसरी कन्या "कुमारी" सगळयात जास्त देवभक्त होती. ती नेहमी बालाजीच्या नामाचा जप करायची. वडिलांच्या नकळत कायम श्रीबालाजीच्या मंदिरात देवदर्शनासाठी जायची. घरी येऊन वडील सोडून बाकी सगळयांबरोबर प्रसाद ग्रहण करायची. पतीच्या अश्या नास्तिक वर्तणूकीला बघून कांतिमती थोडी चिंतित व्हायची.

एक दिवस "कुमारी" च्या मैत्रिणीकडे "श्री बालाजी" चे व्रत करत होते. हे कळल्यावर ती तिथे गेली. दुपारी व्रत पूर्ण झाले. थोडासा प्रसाद तिने खाल्ला व थोडा घरच्यांसाठी एका कागदाच्या पुडीत बांधून घेतला. मधे रस्त्यात तिला खूप तहान लागली. ऊन मी म्हणत होते. तिने विचार केला, कुठेतरी थांबून पाणी पिऊन मग घरी जावे. तेवढ्यात तिच्या लक्षात आले की त्यांचे दुकान पुढच्याच गल्लीत आहे. तिथे जाऊन बाबांना पूजेबद्दल काही न सांगता तिने पाणी मागितले. बाबा रागावतील या भीतिने घटाघटा पाणी प्यायले. त्या घाईत प्रसादाची पुडी तिथे दुकानात विसरुन ती घरी गेली.

एकाएकी बाजारात कोलाहल माजला. लोक आरडाओरड करत इकडेतिकडे पळू लागले. गल्लीतील सारी दुकाने आगीत भस्मसात्‌ होत होती. दुपारची वेळ...भरीला गरम वारे वाहत होते...धनगुप्त भीतिने थरथर कापू लागला. "...काही वेळातच माझे दुकानही जळून खाक होणार..." या विचाराने त्याच्या हातापायाला कंप सुटला. सगळे लोक आपापल्या दुकानांमधून बाहेर पडले व आगीपासून दूर पळू लागले. पण धनगुप्त तिथेच उभा राहिला...दुकान सोडून जायला तो तयार होईना... जर दुकानातच थांबला तर तो जळून राख होणार...या भीतिने हातात येईल ती पुडी उचलून मागचा-पुढचा विचार न करता जे हाताला लागले ते त्याने तोंडात टाकले. तोंडात गोड चव आली आणि मनाला दिलासा मिळाल्यासारखे वाटले.

तेव्हा एक अद्‌भुत घटना घडली...आग धनगुप्तच्या दुकानापर्यंत येऊन थांबली. आगीची झळही दुकानाला लागली नाही...हे काय अघटित...ही कसली किमया? ...धनगुप्तच्या तोंडून शब्दही फुटत नव्हता...तिकडे आगीची बातमी कळताच पत्नी कांतिमती, तिच्या मुलींना घेऊन, बालाजीचे नामस्मरण करत घाईघाईने दुकानापाशी आली...आग त्यांच्या दुकानापाशी येऊन थांबलेली बघून तिला खूप आश्चर्य वाटले. तेवढ्यात कुमारीला दुकानात विसरलेल्या प्रसादाच्या पुडीची आठवण आली...धनगुप्तला झाला प्रकार

समजायला वेळ लागला नाही. जी गोष्ट त्याने खाल्ली होती तो देवाचा प्रसाद होता. त्या प्रसादाचा महिमा थोर की तो एवढ्या मोठ्या दुर्घटनेतून वाचला होता.

धनगुप्तने श्रीबालाजीची क्षमा मागितली, स्वःताच्या मुस्कटात मारले. संध्याकाळी लगेचच नगरातल्या लोकांना बोलावून "श्रीबालाजीचे व्रत" केले. तेव्हापासून तो देवाच्या सेवेत वेळ घालवू लागला. शेवटी मोक्ष मिळवला. आपण बघितले की केवळ प्रसाद ग्रहण करण्याने धनगुप्त भल्या मोठ्या संकटातून पार पडला. बालाजीचा महिमा अगाध आहे. आपण सर्वजण यथाशक्ति व्रत करुन परमेश्वराचा अनुग्रह प्राप्त करु शकतो."

श्रीभरद्वाजमुनींनी ही चतुर्थ कथा येथे संपवली.

## गोविंद...गोविंद...गोविंद

## चतुर्थोध्याय: समाप्तं |

श्रिय: कांताय कल्याण निधये निधयेर्धिनाम् ।
श्री वेंकटनिवासाय श्रीनिवासाय मंगलम् ||

# पंचम अध्याय
## श्री अत्रि उवाच

तिरुमला-तिरुपतीला भूलोकाचे वैकुण्ठ धाम म्हणतात. पुराणांत म्हटले आहे की तिरुमलासारखे पवित्र क्षेत्र आणि श्रीबालाजीसारखे दैवत न आधी कधी झाले आणि न पुढे कधी होणार. श्रीनिवासाच्या रुपात अवत्तीर्ण झालेले श्रीनारायण आपल्या भक्तांवर अतोनात प्रेम करतात. जे त्यांच्यावर आपला सगळा भार टाकतात, त्यांचे नित्य नामस्मरण करतात, सदाचारी जीवन जगतात त्यांचे ते रक्षण करतात. अशा श्रीबालाजीला प्रसन्न करण्याचा सर्वात सोपा उपाय आहे - "श्रीबालाजीची व्रत कथा".

या अद्भुत व्रत कथेची माहिती देताना महातपसंपन्न श्री अत्रि महर्षि म्हणतात, "हे बालाजीच्या प्रिय भक्तांनो, कलियुगात आपल्या सौभाग्याबद्दल काय बोलावे? कृतयुग, त्रेतायुग आणि द्वापारयुगात अत्यंत कठोर तप-जप करुनही प्रसन्न न होणारे श्रीनारायण, या युगात केवळ नामस्मरणाने आपल्यावर कृपा करत आहेत. विश्वासाने मारलेल्या तुमच्या हाकेला ते प्रतिसाद देत आहेत. असे करुणामयी आहेत श्रीबालाजी. पवित्र तिरुमला पहाडावर ठेवलेले एक पाऊल तुमच्या अनेक जन्मांच्या पुण्यफलाइतके आहे.

प्राचीन काळात "कौमार" देशात "मित्र" नामक धोबी रहात असे. तो रोजच्या त्याच्या कामाबरोबर धार्मिक कार्य करत जीवन निर्वाह कर होता. त्याचे अपंगत्व हीच त्याची मोठी चिंता होती. त्यामुळेच धुतलेल्या कपड्यांचे गाठोडे बांधून, घरोघरी पोहोचवणे त्याला कठीण होऊ लागले होते. त्याचे कुटूंब मोठे होते. मेहनत केल्याशिवाय दोन वेळेला खायला मिळणे अशक्य होते. नियमितपणे तो श्रीबालाजीची पूजा करायचा. एक ना एक दिवस देव प्रसन्न होईल या आशेवर तो जगत होता. भक्तांवर कृपा करणारे बालाजी हे सगळे बघत होते. जी व्यक्ति आपल्या कर्मांतून मुक्त होते त्या व्यक्तिचे बालाजी कुठल्या ना कुठल्या रुपात येऊन रक्षण करतात.

एक दिवस संध्याकाळी नेहमीप्रमाणे मित्र कपडे धुवून त्यांचे गाठोडे पाठीवर टाकून हळूहळू चालला होता. वाटेत त्याला एक वृद्ध ब्राह्मण भेटले. पाठीवरचे गाठोडे खाली उतरवून आपल्यापेक्षा वयाने मोठ्या असलेल्या ब्राह्मणाला त्याने आदराने खाली वाकून नमस्कार केला. त्यावर विप्रोत्तम म्हणाला, "तुला तुझ्या या अपंग पायाने किती कष्ट सोसावे लागत आहेत. तुझे दु:ख बघवत नाही." मित्र म्हणाला, "हे नाथ, आपण मोठे आहात, मोठा परिवार असल्यामुळे मला या कामातून मोकळीक मिळू शकत नाही. हे अपंगत्व जाण्यासाठी काही उपाय मला सांगितलात तर बरे होईल."

त्यावर ब्राह्मण म्हणाला, "ऐक, मी जरूर सांगेन, लक्षपूर्वक ऐक. एक असे व्रत सांगतो आहे जे केल्याने तुझे अपंगत्व नाहीसे होईल. तुला अष्ट ऐश्वर्ये मिळतील. व्रत संपन्न करताच तुला हजार मोहरा मिळतील...पण एक अट आहे...त्यातल्या अर्ध्या मोहरा तू मला द्यायच्या...उद्या मी पुन्हा तुला याच वेळी इथे भेटेन." मित्र म्हणाला, "स्वामी! मी फारच भाग्यवान आहे. आजच मला या व्रताबद्दल सांगा, मी ते पूर्ण करेन." मित्राच्या उत्साहाला बघून वृद्ध ब्राह्मणाने श्री बालाजीच्या व्रत कथेबद्दल सांगितले.

मित्र दुप्पट उत्साहाने घरी आला, घडलेली सगळी कहाणी पत्नीला सांगितली. शेजार-पाजारी गोळा करुन त्याने श्रीबालाजी व्रत पूर्ण केले. चरणामृत, प्रसाद ग्रहण केला. घरी आलेल्या सर्व लोकांना वाटला. तेवढ्यात घराबाहेर गोंधळ ऐकू आला...मित्राचा मुलगा पळत-पळत आत आला, "बाबा! बाबा! राज-रक्षक आले आहेत. त्यांचे तुमच्याकडे काम आहे. राजाने तुमच्यासाठी भेंट पाठवली आहे." इतक्यात रक्षक तेथे आले. त्यांनी सांगितले की त्याची राजदरबारी धोबी म्हणून नियुक्ति झाली आहे. राजाने हजार मोहरा बक्षिस दिल्या आहेत. असे म्हणून त्यांनी मित्राच्या हातात हजार मोहरांची थैली सोपवली. एका आठवड्यात त्याला नोकरीत भरती होण्यास सांगितले. मित्राला आनंद झाला. एक आठवडा कशाला, उद्याच का नको, असा विचार करून त्याने आपले सामान बांधले व दुसरे दिवशीच तो निघाला. या घाईगडबडीत

तो त्या वृद्ध ब्राह्मणाची अट विसरला. अर्ध्या रस्त्यात त्याला ती अट आठवली, ठीक आहे...पुढच्या महिन्यात त्याला भेटेन असा विचार करून तो राज दरबारी पोचला. दिवस...महिने गेले. ब्राह्मणाच्या वेशात आलेल्या परमेश्वराला राग आला. माणसाची प्रवृत्तिच अशी आहे. त्याला माझा महिमा दाखवलाच पाहिजे.

दुसरे दिवशी राणीवशातून दागिने चोरीला गेले...चोरीचा आळ मित्रावर आला. मित्राला कारावासाची शिक्षा झाली...राजरक्षकांनी त्याला हरतह्लेच्या यातना दिल्या...असे का झाले...माझ्यावर असा आळ का आला, विचारात गुंगलेल्या मित्राला स्वप्नात देवाने दर्शन दिले. सांगितले की "वृद्ध ब्राह्मणाच्या रूपात मीच आलो होतो, तू तुझ्या वचनाला जागला नाहीस म्हणून हे घडले..." मित्र म्हणाला, "हे नाथ! मी पापी आहे...मी खूप मोठे पाप केले आहे...कृपया माझ्यावर दया करा... आता मी प्रत्येक महिन्याला आपले व्रत संपन्न करीन. माझ्या कमाईतील अर्धा भाग आयुष्यभर आपल्याला समर्पित करीन." कान पकडून त्याने देवाची कळवळून प्रार्थना केली. भक्तांची हाक ऐकणारया श्रीबालाजींनी मित्रावर कृपा केली. त्यांच्या कृपेने राणीचे सर्व दागिने दुसरयाच दिवशी मिळाले. राजाला मित्राने चोरी न केल्याचेही कळले. त्यामुळे त्याची कारावासाची शिक्षा रद्द झाली. तेव्हापासून मित्र देवाला दिलेल्या वचनानुसार प्रत्येक महिन्याला श्रीबालाजीचे व्रत संपन्न करु लागला, व आपल्या कमाईतील अर्धा भाग देवाला अर्पित करत राहिला. सुखपूर्ण जीवन जगून शेवटी मोक्ष मिळवला."

श्री अत्रिमुनींनी असे सांगून पाचवा व शेवटचा अध्याय संपवला.

## गोविंद...गोविंद...गोविंद

## पंचमोध्याय: समाप्तं

श्रिय: कांताय कल्याण निधये निधयेर्धिनाम् ।
श्री वेंकटनिवासाय श्रीनिवासाय मंगलम् ||

## क्षमार्पणम्

मन्त्रहीनं क्रियाहीनं भक्तिहीनं जनार्दन । यत्पूजितम् मया देव परिपूर्णम् तदस्तुते ॥

अनया ध्यानावाहनादि षोडशोपचार पूजया च भगवन सर्वात्मकः श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्री वेंकटेश्वर स्वरुपो भगवानः सुप्रीतः सुप्रसन्नो वरदो भवतु। श्री वेंकटेश्वर देव प्रसादं शिरसा गृह्णामि।

## तीर्थम्

अकाल मृत्युहरणं सर्वव्याधि निवारणम् । सर्व पापक्षयकरं देव पादोदकं पावनं शुभं ॥

## नैवेद्यम्

ॐ भूर्भुवस्सुवः, ॐ तत्सवितुर्वरेण्यम् भर्गोः देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात्, सत्यं त्वर्तेन परिषिंचामि, अमृतमस्तु अमृतोपस्तरणमसि, ॐ प्राणाय स्वाः, ॐ अपानाय स्वाः, ॐ व्यानाय स्वाः, ॐ उदानाय स्वाह, ॐ समानाय स्वाः, ॐ ब्रह्मणे स्वाः॥

श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्रीवेंकटेश्वर स्वामिने नमः – महानैवेद्यम् समर्पयामि ॥

अमृतापिधानमसि उत्तरापोशनम् समर्पयामि, हस्तौ प्रक्षालयामि, पादौ प्रक्षालयामि, शुद्ध आचमनीयं समर्पयामि ॥

ताम्बूलं समर्पयामि, सुवर्णमन्त्रपुष्पं समर्पयामि, प्रदक्षिण नमस्कारन समर्पयामि ॥

अनयाध्यानावाहनादि षोडषोपचार पूजया भगवान सर्वात्मकः श्री लक्ष्मी पद्मावती समेत वेंकटेश्वर स्वामी सुप्रीत सुप्रसन्नो वरदो भवतु, श्री लक्ष्मी पद्मावती समेत वेंकटेश्वर स्वामी प्रसादं शिरसा गृह्णामि ॥

## उद्वासनम्

यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् ।
तेहनाकं महिमानस्सचन्ते यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः ॥
गच्छ गच्छ सुरश्रेष्ठ स्वस्थान श्री वेंकटेश्वर । भक्ताभीष्ट समृध्यर्थम् पुनरागमनाय च ॥
श्री लक्ष्मी पद्मावती समेत श्री वेंकटेश्वर स्वामी यथास्थानं उद्वासयामि॥


तारीखः सप्टेंबर १३, २०१०


तारीख: सप्टेंबर १८, २०१०


तारीख: सप्टेंबर १८, २०१०


तारीखः सप्टेंबर २०, २०१०


तारीखः सप्टेंबर २०, २०१०


तारीखः सप्टेंबर २१, २०१०


तारीखः सप्टेंबर २६, २०१०


तारीखः ऑक्टोबर १०, २०१०

# श्री वेंकटेश्वर व्रत कथा



https://www.venkateswaravratham.org
info@venkatewaravratham.org